# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२७७ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि.३० नोव्हेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## पाणी प्रश्नामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या; नवं सरकार महाराष्ट्राला पाणीदार करणार, फडणवीसांचं प्रतिपादन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०पुणे**

पाण्याचा प्रश्न सोडवल्याशिवाय महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी होणार नाहीत. कारण महाराष्ट्रात ५० टक्केपेक्षा जास्त भागात कायम दुष्काळजन्य परिस्थिती असते.ती बदलण्यासाठी पाणीदार महाराष्ट्र करणं हा एकमेव पर्याय आहे असं प्रतिपादन देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. ते पुण्यात बीजेएस नॅशनल कन्व्हेन्शनमध्ये बोलत होते.




आज अनेक मुलांना ९९ टक्के गुण मिळतात. परंतु, त्यांच्या या गुणांमध्ये काही मुल्यांचं रोपण झालं का? त्यांच्या गुणांमध्ये काही कौशल्य मिळालं का असं म्हणत आजच्या परिस्थितीमध्ये फक्त मार्क्स महत्वाचे नाहीत तर त्यामध्ये मुल्य विचार फार महत्वाचे आहेत. त्याचबरोबर फडमवीस यांनी संविधानावरही भाष्य केलं आहे. ते म्हणाले मुलांना संविधान समजावण हे प्राथमिक कर्तव्य आहे. कारण सर्वांना संविधान समजने हे पहिलं कर्तव्य आहे असंही फडणवीस यावेळी म्हणाले.माझं एकच काम आहे की ज्या ज्या ठिकाणी सज्जन लोक चांगलं काम करत आहेत त्यांच्या पाठिशी उभं राहण हे महत्वांच काम आहे. आज महाराष्ट्रात पाणी फाऊंडेशन, इतर हे पाण्याविषयी काम चालू आहे त्या सर्व कामांत माझा कायम सपोर्ट असेल असं आश्वासनही फडणवीस यांनी यावेळी दिलं. त्याचबरोबर पाणी योजनेवर सरकारचं लक्ष असणार आहे असं आश्वासनही फडणवीस यांनी यावेळी दिलं आहे.

देशात जी फाईव्ह ट्रिलीयन इकॉनॉमी आहे त्यातील मोठा हिस्सा हा जैन समाजाचा असतो. जैन समाजाने मोठ्या प्रमाणात कायम देण्याचं काम केलं आहे. तसंच, हा समाज जितकं कमावतो त्यापेक्षा जास्त देण्याचं काम करतो असं म्हणत फडणवीस यांनी जैन समाजाचं कौतुक केलं आहे. तसंच, समाजात सकारात्मक काम करण्याचं काम जैन समाज कायम करत आला आहे असंही फडणवीस यावेळी म्हणाले आहेत.

## गोंदिया जिल्ह्यात पुन्हा बसचा अपघात चालक-वाहक किरकोळ जखमी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०गोंदिया**

नागपूरहून ते गोंदियाला जाणाऱ्या शिवशाही बसचा शुक्रवारी अपघातात झाला होता. त्यात ११ प्रवाशांचा मृत्यू आणि सुमारे २० प्रवासी जखमी झाले होते. या घटनेची शाही वाळत नाही तोच गोंदिया जिल्ह्यातील देवरी तालुक्यातून चिचगडकडे विद्यार्थ्यांना घेण्यासाठी जात असलेल्या साकोली आगाराच्या साकोली ते केशोरी जाणाऱ्या मानव विकासच्या निळ्या एस .टी.बस क्रमांक एम.एच.४० ए. क्यू. ६०५० चा अपघात झाल्याची घटना शनिवारी सकाळी ६:३० वाजताच्या सुमारास घडली. सुदैवाने ही बस रिकामी असल्यामुळे कुठलीही जीवित हानी झाली नाही.



दररोजच्या प्रमाणे आज शनिवार सकाळची शाळा असल्यामुळे विद्यार्थ्यांना घेण्याकरिता जात असलेल्या एस.टी. बस ही ३० नोव्हेंबर रोजी विद्यार्थ्यांना आणण्यासाठी चिचगड कडे जात असताना अब्दुलटोला ता. देवरी गावाजवळ एका दुचाकीला वाचविण्याच्या प्रयत्नात चालकाचे बस वरून नियंत्रण सुटले आणी बस सरळ रस्त्याचा कडेला खाली उतरली दरम्यान सकाळ च्या सुमारास रस्त्यावरून जाणाऱ्या लोकांनी याची माहिती जवळील गावकऱ्याना व पोलिसांना दिली.

देवरी पोलिसांनी व गावकऱ्यांनी घटना स्थळी धाव घेत वाहक मंजुषा लांजेवार आणी चालक हिवराज वासुदेव मडावी यांना देवरी ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. यात चालक हिवराज आणी वाहक मंजुषा किरकोळ जखमी झाले आहेत. तर विशेष बाब म्हणजे कालच शुक्रवारी गोंदिया कोहमारा रोडवर शिवशाही एस.टी बस चा अपघात झाला असता ११ प्रवाशांचा मृत्यू झाला होता तर २० प्रवासी जखमी झाले आहेत त्यांच्यावर गोंदिया वैद्यकीय महाविद्यालयात उपचार सुरु आहे. असे असताना आज शनिवारी सकाळी पुन्हा एकदा एस. टी. बस चा अपघात घडल्याने या पुढे एस.टी. बस मध्ये प्रवास करावे की नाही असा प्रश्न मानव विकासच्या बसमधून प्रवास करणारे शालेय विद्यार्थी आणी इतराना पडला आहे.

आज शनिवारी साकोली आगारातून साकोली ते केशोरीला जात असलेल्या मानव विकासच्या एस.टी. बस चा किरकोळ अपघात सकाळी झाला आहे. चालक आणि वाहक दोघांना किरकोळ जखम झालेली असून दोघांना उपचाराकरिता देवळी ग्रामीण रुग्णालयात गावकऱ्यांनी नेले होते उपचार करून त्यांना सुट्टी देण्यात आलेली असल्याची माहिती साकोली आगाराचे उईके यांनी दिली.

## मीडियासमोर वक्तव्य करून निर्णय होत नाही गृह खात्याच्या मागणीवर भाजपाचं प्रत्युत्तर



**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०मुंबई**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे निकाल २३ नोव्हेंबर रोजी जाहीर झाले. या निवडणुकीत महायुतीने २३५ जागा जिंकत स्पष्ट बहुमत मिळवलं आहे. त्यामुळे आता राज्यात महायुतीचा मुख्यमंत्री होणार हे निश्चित होऊन आठवडा उलटला. तरी मुख्यमंत्री नेमकं कोण होणार? याचं गणित सुटलेलं नाही. तसेच महायुतीने सत्तास्थापन केलेली नाही. अशातच भाजपाने आमचाच मुख्यमंत्री होणार हे स्पष्ट केलं असून एकनाथ शिंदे व अजित पवारांनी शर्यतीतून माघार घेतली आहे. दरम्यान, एकनाथ शिंदे यांच्याकडून महायुती सरकारमध्ये जास्तीत जास्त मंत्रिपदं व गृहमंत्रीपद मिळावं यासाठी प्रयत्न सुरू आहेत. शिंदेंचे निकटवर्तीय, छत्रपती संभाजीनगरचे आमदार व पक्षाचे प्रवक्ते संजय शिरसाट म्हणाले, आधीच्या सरकारमध्ये देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री होते व त्यांच्याकडे गृहमंत्रीपद देखील होतं. आता भाजपाकडे मुख्यमंत्रीपद असणार आहे व शिवसेनेकडे (शिंदे) नैसर्गिकरित्या उपमुख्यमंत्रीपद येणार असेल तर त्याबरोबर गृहमंत्रीपदही मिळायला हवं. शिरसाटांच्या या वक्तव्यावर आता भारतीय जनता पार्टीनेही प्रतिक्रिया दिली आहे.

भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी काही वेळापूर्वी पत्रकार परिषद घेतली. यावेळी ते म्हणाले, कुठल्याही सरकार स्थापनेच्या चर्चा या प्रसारमाध्यमांच्या बातम्यांद्वारे होत नाहीत किंवा इलेक्ट्रॉनिक मीडियासमोर एखादं वक्तव्य करून अशा प्रकारच्या चर्चा होत नाहीत. जे काही निर्णय असतील ते काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस व अजित पवार हे तीन प्रमुख नेते घेतील. हे तिघे एकत्र बसून चर्चा करतील आणि निर्णय घेतील. त्यानंतर भाजपाचं केंद्रीय नेतृत्व त्या निर्णयाला मान्यता देईल. ही खूप सोपी गोष्ट आहे. मी प्रसारमाध्यमांसमोर काहीतरी बोललो किंवा इतर कोणी काहीतरी बोललं या चर्चेतून किंवा प्रसारमाध्यमांना दिलेल्या बाईटमधून सरकार स्थापनेच्या चर्चा होत नाहीत. सरकार स्थापन होत नाही.

## जनतेचा ५ महिन्यात कौल बदलला त्याला काय करणार बाबा आढावांच्या भेटीनंतर अजितदादांचा सवाल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३० पुणे**

ज्येष्ठ समाजसेवक व लेखक बाबा आढाव हे पुण्यात गेल्या दोन दिवसांपासून आत्मक्लेश आंदोलन करत आहेत. विधानसभा निवडणुकीत सरकारी पैशांचा वापर झाला असून ईव्हीएमबाबत संशय घेण्यास जागा असल्याचे बाबा आढाव यांनी म्हटलं आहे. आज सकाळी शरद पवार यांनी बाबा आढाव यांची भेट घेतल्यानंतर अजित पवार हे देखील आंदोलनाच्या स्थळी पोहोचले. यावेळी त्यांनी बाबा आढाव यांच्याशी चर्चा करून आंदोलन मागे घेण्याची विनंती केली.



संविधानाने दिलेल्या अधिकारानुसार प्रत्येकाला आपलं मत मांडण्याचा अधिकार आहे. त्या प्रमाणे बाबा आढाव यांनी आपलं मत मांडले. काही गोष्टी या निवडणूक आयोगाशी तर काही सुप्रीम कोर्टाशी संबधित आहेत. त्यामुळे त्यांना जे योग्य वाटतं त्यानुसार त्यांनी निकाल दिले आहेत. खरंतर वयस्कर लोकांना मतदार केंद्रावर जाऊन त्रास होऊ नये म्हणून निवडणूक आयोगाने ८५ वर्षांच्या व्यक्तींच्या घरी जाऊन मतदान करण्याची योजना राबवली होती. लवकर अंधार होत असल्याने लाईटची सुविधा मतदान केंद्रांवर करण्यात आली होती, असं अजित पवार यांनी म्हटलं.

लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या ३१ जागा आल्या. आमच्या १७ जागा आल्या. हा जनतेचा कौल असल्याचे आम्ही मान्य केलं. त्यावेळी ईव्हीएमबद्दल कुणी बोललं नाही.बारामतीमध्ये मी जो उमेदवार उभा केला होता तो ४८ हजार मतांनी पराभूत झाला आणि नंतर लगेचच सात महिन्यांनी निवडणुका आल्या. त्या निवडणुकीत मीच ४८ हजारांची भर काढून १ लाखांपेक्षा अधिक मतांनी निवडून आलो. जनतेचा कौल आहे. जनताच म्हणत होती लोकसभेला ताईला आणि विधानसभेला दादाला. त्यामध्ये जनतेने कुणाचं ऐकलं नाही. जनतेचा पाच महिन्यात कौल बदलला त्याला आम्ही काय करणार, असा सवाल अजित पवार यांनी केला.

१९९९ मध्ये लोकसभा निवडणुकीत लोकांनी वाजपेयींना मतदान केलं आणि विधानसभेला विलासराव देशमुखांना केले. त्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसने एकत्र येऊन सरकार स्थापन केलं. मतदार लोकसभेला शरद पवारांना आणि विधानसभेला मला मतदान करत होता. तरीही शरद पवारांना ८५ हजार तर मला ५० हजारांचे मताधिक्य मिळालं. त्यावेळी मी असं म्हटलं नाही की मला २५ हजार मते कमी का पडली. हा लोकांचा कौल होता आणि तो मान्य केला पाहिजे, असंही अजित पवार म्हणाले.

काही पराभूत उमेदवार मला सांगतात की आमचा पराभव झाला. मी त्यांना सिद्ध करुन दाखवा असं सांगतो. नाना पटोले परवा म्हणाले की संध्याकाळी कसं मतदान वाढलं. साडेचार आणि पाचच्या पुढे लोक रांगेत आले मग त्यांना आतमध्ये घेतलं. माझ्या इथे सकाळी सात ते नऊ पाच टक्के मतदान झालं होतं. त्यानंतर मतदान संपेपर्यंत टक्केवारी १५ टक्क्यांनी वाढली. त्याला आमचा काय दोष आहे. मतदारांनी कधी रांगेत यायचं आणि कधी मतदान करायचं तेच ठरवणार, असं अजित पवारांनी स्पष्ट केलं.

## देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महाराष्ट्र देशात अव्वल होईल, हसन मुश्रीफ यांचा विश्वास

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०गडहिंग्लज**

देवेंद्र फडणवीस हेच मुख्यमंत्री होतील अशा बातम्या प्रसारमाध्यमात येत आहेत. ते दुसऱ्यांदा राज्याचे नेतृत्व करतील. त्यांच्या नेतृत्वात महाराष्ट्र हे देशात अव्वल राज्य होईल आणि राज्याची अर्थव्यवस्था देशात तिसऱ्या क्रमांकावर येईल, असा विश्वास माजी पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी व्यक्त केला.

गडहिंग्लज शहर राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे आयोजित विजयोत्सव आणि बांधकाम कामगारांना भांडीसंच वाटपप्रसंगी ते बोलत होते. लाडक्या बहिणी आणि बांधकाम कामगार हेच विधानसभा निवडणुकीत खरे 'गेम चेंजर' ठरले, असेही त्यांनी सांगितले.



मुश्रीफ म्हणाले, हिंजवडीप्रमाणे कोल्हापूर येथे आयटी पार्क करण्याचा आपला प्रयत्न आहे. गडहिंग्लजमध्ये बेघरांसाठी ३ हजार घरकुले, उपजिल्हा रुग्णालयात 'एम.आर.आय' सुविधा, एमआयडीसी नवे उद्योग व शहरात सुसज्ज फुटबॉल स्टेडिअम तयार करण्यासाठी आपण वचनबद्ध आहोत. नगरपालिकेची एकहाती सत्ता दिल्यास गडहिंग्लज राज्यातील अव्वल शहर बनवू.

यावेळी सतीश पाटील, रमेश रिंगणे, शिवाजी भुकेले यांचीही भाषणे झाली. महेश सलवादे यांनी स्वागत केले. अमर मांगले यांनी आभार मानले.

## निकालाबाबत शंका, इव्हीएमवर संशय....राज्यातील पराभूत उमेदवारांनी इव्हीएम पडताळणीसाठी केला अर्ज

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०मुंबई**

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीचे निकाल हे विरोधी पक्षांच्या दृष्टीने कमालीचे धक्कादायक लागले आहेत. त्यात विरोधी बाकांवरील महाविकास आघाडीमधील तिन्ही प्रमुख पक्षांची अनपेक्षित अशी घसरगुंडी उडाली. तसेच अनेक मतदारसंघांमध्ये बड्या नेत्यांना पराभवाचा धक्का बसला. आता यापैकी अनेक पराभूत उमेदवारांकडून निकालाबाबत शंका उपस्थित करण्यात येत आहे. तसेच त्यातील २४ पराभूत उमेदवारांनी इव्हीएमवर संशय घेत पुन्हा मतमोजणीसाठी अर्ज केला आहे. फेरमतमोजणीसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांमध्ये काँग्रेसचे बाळासाहेब थोरात, ठाकरे गटाचे राजन विचारे आदी मोठ्या नेत्यांचा समावेश आहे. या नेत्यांबरोबरच भाजपाचे राम शिंदे यांनीही फेरमतमोजणीसाठी अर्ज दाखल केला आहे.

निकालांबाबत संशय व्यक्त करत इव्हीएम पडताळणीसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांमध्ये काँग्रेसचे संगमनेरचे उमेदवार बाळासाहेब थोरात, पुणे कॉन्टोन्मेंटमधील काँग्रेसचे उमेदवार रमेश बागवे, शरद पवार गटाचे नगर शहरमधील उमेदवार



अभिषेक कळमकर, भाजपाचे कर्जत जामखेडमधील उमेदवार राम शिंदे, शरद पवार गटाच्या पारनेरच्या उमेदवार राणी लंके, शरद पवार गटाचे राहुरीचे उमेदवार प्राजक्त तनपुरे यांचा समावेश आहे.

याशिवाय शरद पवार गटाचे कोपरगावचे उमेदवार संदीप वर्पे, विक्रमगडमधील उमेदवार सुनील भुसारा, हडपसरचे उमेदवार प्रशांत जगताप, शिरूरचे उमेदवार अशोक पवार, खडकवासल्याचे उमेदवार सचिन दोडके आणि चिंचवडचे उमेदवार राहुल कलाटे यांचाही इव्हीएम पडताळणीसाठी अर्ज केलेल्या पराभूत उमेदवारांमध्ये समावेश आहे.

शरद पवार गटाकडून आणखी काही पराभूत उमेदवारांनी इव्हीएमच्या पडताळणीसाठी अर्ज केले आहेत. त्यामध्ये तुमसरचे चरण वाघमारे, धाराशिवचे राहुल मोटे आणि अणुशक्तीनगरचे फहाद अहमद यांचा समावेश आहे. इव्हीएमविरोधात आक्रमक भूमिका घेतलेल्या ठाकरे गटाच्याही काही उमेदवारांनी इव्हीएमविरोधात आक्रमक पवित्रा घेत फेरतपासणीसाठी अर्ज केला आहे. त्यामध्ये कोपरी पाचपाखाडीचे केदार दिघे, ठाणे शहरमधील उमेदवार राजन विचारे, ओवळा माजिवड्याचे नरेश मणेरा, डोंबिवलीचे दीपेश म्हात्रे, ऐरोलीचे एम. के. मढवी आणि राजापूरचे राजन साळवी यांचा समावेश आहे. तर बहुजन विकास आघाडीचे वसईतील उमेदवार हितेंद्र ठाकूर, नालासोपाऱ्यातील क्षीतिज ठाकूर आणि बोईसरचे राजेश पाटील यांनीही इव्हीएमच्या पडताळणीसाठी अर्ज केला आहे.

## विधानसभेच्या मतदानाआधीच काँग्रेसला लागली होती पराभवाची कुणकूण? तो अंतर्गत सर्व्हे चर्चेत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३० मुंबई**

नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला दारुण पराभवाचा सामना करावा लागला होता. त्यात एकेकाळी राज्यात निर्विवाद सत्ता असलेल्या काँग्रेसचीही जबर पिछेहाट होऊन पक्षाला अवघ्या १६ जागांवर समाधान मानावे लागले होते. या पराभवानंतर काँग्रेसच्या नेत्यांकडून इव्हीएम आणि निवडणूक प्रक्रियेबाबत संशय व्यक्त केला जात आहे. दरम्यान, विधानसभा निवडणुकीत होणाऱ्या पराभवाची कुणकूण काँग्रेसला मतदानाआधीच लागली होती की काय, अशी चर्चा आता रंगली आहे. विधानसभा निवडणुकीदरम्यान, काँग्रेसने केलेल्या एका अंतर्गत सर्व्हेमधील निष्कर्षांबाबतचं वृत्त एका वृत्तपत्राने प्रसिद्ध केल्याने ही चर्चा सुरू झाली आहे.

## संपादकीय ......

# डोक्यावर पडलात तर!

मुंबईसह राज्यभरात पुन्हा एकदा हेल्मेटसक्तीचा विषय जोर धरताना दिसत आहे. त्याला कारणीभूत ठरले आहे ते अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) कार्यालयाने २५ नोव्हेंबर २०२४ रोजी जारी केलेले एक परिपत्रक. या परिपत्रकानुसार राज्यातील विविध शहरे आणि जिल्ह्यांतील पोलीस आयुक्त, पोलीस सहआयुक्त आणि पोलीस अधीक्षकांना विनाहेल्मेट वाहन चालवणार्या चालकांसोबतच विनाहेल्मेट सहप्रवाशावरही कडक कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

मागील ५ वर्षांमध्ये वाढलेले रस्ते अपघात आणि विनाहेल्मेट वाहनचालक, सहप्रवाशाविरोधात कडक कारवाई होत नसल्याकडे या परिपत्रकातून अंगुलिनिर्देश करण्यात आला आहे. एकूणच काय तर रस्ते अपघातांच्या वाढत्या संख्येचा हवाला देत महाराष्ट्र वाहतूक विभागाने पुन्हा एकदा राज्यभर हेल्मेटसक्तीचा विषय हाती घेतला आहे, तर दुसरीकडे वाहनचालक या विषयावर पुन्हा नाकं मुरडू लागले आहेत.

वाहतूक पोलिसांच्या 'वर'कमाईत भर पडावी इथपासून ते हेल्मेट कंपन्यांच्या विक्रीत वाढ व्हावी इथपर्यंतच्या चर्चा सोशल मीडियावर हॉट टॉपिक होऊ लागल्या आहेत.

आपल्याकडे हेल्मेटसक्तीचे फर्मान काढावे लागते हेच मुळात दुर्दैवी आहे. रस्ते अपघातांची कारणमीमांसा करताना असे आढळते की यांत्रिक दोषापेक्षा मानवी दोषाने होणार्या अपघातांचे प्रमाणच भारतात सर्वाधिक आहे. मद्यपान करून वाहन चालवणे, मोबाईलवर वा वाहनातील सहप्रवाशांसोबत बोलत रस्त्याकडे लक्ष न देता वाहन चालवणे, पुरेशी झोप न घेता रात्रीच्या वेळेत वाहन चालवणे, सिग्नल वा लेनची शिस्त न पाळणे, वेगाने वाहन चालवणे, सीट बेल्ट न लावणे या व इतर अनेक कारणांमुळे चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटून बहुतांश चारचाकींचे अपघात होतात. दुचाकीस्वारांना होणार्या अपघातांची कारणेही वेगळी नाहीत.

भारतात दरवर्षी सरासरी दीड लाखांहून अधिक जण रस्ते अपघातांमध्ये प्राण गमावतात. यात सर्वाधिक अपघात हे दुचाकी वाहनांचे असून डोक्याला गंभीर दुखापत होऊन मृत्युमुखी पडणार्यांचे प्रमाण मोठे आहे. अशा वेळी हेल्मेट नावाचे महत्त्वपूर्ण सुरक्षा कवच घालण्याकडे भारतीय दुचाकीस्वार दुर्लक्ष का करतात, हा संशोधनाचा विषय असून त्यावर आधी काम होणे गरजेचे आहे. मनात आले की हेल्मेटसक्ती लागू करायची, मुख्य रस्त्यातील वाहतुकीला शिस्त लावण्याऐवजी कुठेतरी आडबाजूला लपून बसायचे आणि नियम मोडणार्या वाहनचालकांकडून दंडाच्या स्वरूपात पैसे उकळायचे, पोलिसांच्या या छळवादी वृत्तीलाही वाहनचालक वैतागलेत.

दोन वर्षांपूर्वी संजय पांडे मुंबई पोलीस आयुक्तपदी असताना मुंबईत अशीच हेल्मेटसक्ती लागू करण्यात आली होती. मुंबई पोलिसांच्या वाहतूक विभागाने २५ मे २०२२ रोजी एक परिपत्रक जारी करीत हेल्मेटसक्तीसाठी मुंबईकरांना १५ दिवसांची मुदत दिली होती. ही मुदत संपताच पोलिसांनी धडक कारवाई सुरू केली. कुठे कॅमेर्याच्या माध्यमातून, कुठे वाहनचालकांना अडवून पहिल्याच दिवशी हेल्मेट न घातलेल्या ३,४२१ सहप्रवाशांवर कारवाईचा बडगा उगारला होता, तर चालक, सहप्रवासी मिळून एकाच दिवशी ६,२७१ जणांना ई-चलान जारी केले होते.

या कारवाईवरून संतापलेल्या मुंबईकरांनी टीकेचा भडिमार करताच कारवाई शिथिल करण्यात आली. १५ दिवसांची मुदत देऊनही अनेकांना सहप्रवाशाला हेल्मेटसक्तीची कल्पना नव्हती. त्यामुळे पोलिसांनी अडवल्यानंतर काही जण त्यांच्यासोबत वाद घालत होते. अनेक ठिकाणी साहेब, आजच्या दिवस सोडा. पुन्हा नियम मोडल्यास कारवाई करा, अशी विनंती करीत होते. याचाच अर्थ हेल्मेटसक्तीचा हा नियम तळागाळापर्यंत पोहचलेलाच नव्हता. असेच होणार असेल तर तुम्ही दंड आकारा किंवा वाहन परवाना रद्द करा, त्याने काहीच फरक पडणार नाही.

वाहनचालक पोलिसांसोबत हुज्जतच घालतील. काही पोलिसांच्या हाती चिरीमिरी देऊन निघतील. काही जण पोलीस दिसताच वेग वाढवून पसार होतील, तर काही जण लोकप्रतिनिधींकडे दाद मागून सक्तीचा विषयच मार्गी लावतील. त्यातल्या त्यात मुंबईकर तरी हेल्मेटचा नियम पाळतात. त्या तुलनेत पुणे, नाशिक, कोल्हापूर, नागपूर, औरंगाबाद आदी जिल्ह्यांतील दुचारीस्वारांना तर हेल्मेट नावाचा प्रकारच माहीत नसतो. मध्यंतरी पुण्यात हेल्मेटसक्ती करण्यात आली होती, तेव्हा पुणेकरांनी विराट मोर्चा काढला होता. या मोर्चातील एकाने तर हेल्मेटऐवजी डोक्यात पातेले घातले होते.

शहरातल्या वाहतूक कोंडीमुळे ३० ते ४० किमी वेगाच्या पुढे दुचाकी चालवूच शकत नाही, तर हेल्मेट कशासाठी, असा प्रश्न विचारला जात होता. वाहतूक कोंडी सोडवा, रस्ते खड्डेमुक्त करा. कारण खड्ड्यांमुळे अनेकांचे बळी जातात. प्रवासानंतर हेल्मेट ठेवायचे कुठे? वाहनचालकांच्या या प्रश्नांची उत्तरेही सोडवायला हवीत. हेल्मेटसक्ती ही महामार्गावरच लागू होते. महापालिकेच्या हद्दीत पोलीस हेल्मेटसक्ती करू शकत नाहीत, पोलिसांना असे ज्ञान देणारेही भेटतात. भारतासह महाराष्ट्रातही बाईक रायडिंग, टुरिंगचा ट्रेंड वाढलेला आहे.

# चिमुकल्याचा मृत्यू, तरीही ११ दिवस व्हेंटिलेटरवर ठेवले

## ६ डॉक्टरांवर गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०छत्रपती संभाजीनगर**

डॉक्टरांकडे देव म्हणून पाहिले जाते, कारण त्यांच्याकडे गेले की रुग्ण बरा होईल, असा प्रत्येकाला विश्वास असतो. मात्र छत्रपती संभाजीनगरमधून एक संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. धक्कादायक म्हणजे ऑपरेशन थिएटरमध्ये उपचारासाठी नेलेल्या चिमुकल्याचा चुकीच्या उपचारा मुळे मृत्यू झाला. मात्र समोर आलेल्या रुग्णाच्या अहवाला नुसार, चिमुकल्याचा मृत्यू ११ दिवसांपूर्वीच झाला होता. मात्र डॉक्टरांनी ही गोष्ट लपवून ठेवत चिमुकल्याला व्हेंटिलेटरवर ठेवले होते. याप्रकरणी ६ डॉक्टरांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, साडे पाच वर्षांच्या चिमुकल्याला २० एप्रिल रोजी खाजेचा त्रास होत असल्याने त्याला गारखेड्यातील वेदांत बाल रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. डॉक्टरांनी चिमुकल्याची तपासणी केल्यानंतर त्याला फायमोसीस विथ पिनाईल टॉर्नन हा आजार झाल्याचे सांगितले, तसेच ऑपरेशन करण्याचा सल्ला दिला. त्यानुसार चिमुकल्याच्या कुटुंबियांनी त्याला २५ एप्रिलला ऑपरेशनसाठी रुग्णालयात भर्ती केले. यावेळी डॉक्टरांनी सुरुवातीला २० ते २५ मिनिटात ऑपरेशन होईल, अशी माहिती दिली. मात्र ४५ मिनिटे होऊन देखील ऑपरेशन सुरुच होते. यानंतर तासाभराने डॉक्टरांनी ऑपरेशन चांगलं झाल्याची माहिती दिली.

एका डॉक्टरने चिमुकल्याच्या कुटुंबियांना सांगितले की, तुमच्या बाळाला डॉक्टरने स्पाईनमध्ये भूल दिली होती. परंतु त्याने मध्येच हात हलविल्यामुळे पुन्हा एकदा त्याला झोपेचे इंजेक्शन द्यावे लागले. त्यामुळे तुमचा बाळ सध्या बेशुद्ध आहे. मात्र त्यानंतर ६ मेपर्यंत चिमुकल्यावर आयसीयूमध्येच उपचार सुरू होते. यानंतर डॉक्टरांनी चिमुकल्याला मृत घोषित केले. त्यामुळे कुटुंबियांना संशय आला आणि त्यांनी पोलिसात याप्रकरणी तक्रार दाखल केली.



### पोलीस उपायुक्त काय म्हणाले?

दरम्यान, वेदांत बाल रुग्णालयात घडलेल्या घटनेबद्दल माहिती देताना पोलीस उपायुक्त नवणीत कावत यांनी सांगितले की, मृत चिमुकल्याच्या कुटुंबीयांनी एप्रिल महिन्यात तक्रार दाखल करत रुग्णालयावर आरोप केले होते. याप्रकरणी आम्ही त्यांना कायदेशीर तक्रार दाखल करण्यास सांगितले. त्यानंतर रुग्णालयातील सर्व कागदपत्रे आम्ही शासकीय रुग्णालयात पाठवली. त्यांनी दिलेल्या अहवालनुसार आम्ही ६ डॉक्टरांच्या विरोधात गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्याबाबत पुढील तपासानुसार निर्णय घेण्यात येणार असल्याची माहिती नवणीत कावत यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

# रब्बी पिकात अधिक उत्पादन घ्या आणि जिंका आकर्षक बक्षिसे

## स्पर्धेत कसे व्हाल सहभागी वाचा सविस्तर

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.३० अमरावती –** राज्यामध्ये पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी विविध भागांमध्ये शेतकऱ्यांकडून विविध प्रयोग करण्यात येतात व उत्पादकतेत वाढ करण्यात येते. अशा प्रयोगशील शेतकऱ्यांना, मिळालेल्या उत्पादकतेबाबत प्रोत्साहन देऊन गौरव केल्यास त्यांची इच्छाशक्ती, मनोबल यामध्ये वाढ होऊन आणखी उमेदीने नवनवीन अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल.

यामुळे कृषि उत्पादनामध्ये भर घालण्यासाठी शेतकऱ्यांचे योगदान मिळेल. तसेच त्यांचे मार्गदर्शन परीसरातील इतर शेतकऱ्यांना होऊन राज्याच्या एकूण उत्पादनात मोलाची भर पडेल, हा उद्देश ठेऊन राज्यांतर्गत पीकस्पर्धा योजना राबविण्यात येत आहे.

शासन निर्णय क्र.पीकस्पर्धा २०२०/प्र.क्र.११३/४अे, दि.२० जुलै २०२३ अन्वये रब्बी हंगाम २०२४ मध्येही पिकस्पर्धा मागील वर्षाप्रमाणे तालुका, जिल्हा व राज्य पातळीवर राबविण्यात येत आहेत. त्यानुसार कृषी विभागामार्फत रब्बी हंगाम सन २०२४ मध्ये सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी ज्वारी, गहू, हरभरा, करडई व जवस या ५ पिकांसाठी पिकस्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे.




पीकस्पर्धेतील समाविष्ट पिके ज्वारी, गहू, हरभरा, करडई व जवस (एकूण ०५ पिके)

**पात्रता निकष**

१) स्पर्धेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्याकडे स्वतःच्या नावे जमीन असणे व ती जमीन तो स्वतः कसत असणे आवश्यक आहे.

२) स्पर्धेत भाग घेणाऱ्या शेतकऱ्याला एकाच वेळी एकापेक्षा जास्त पिकासाठी स्पर्धेत भाग घेता येईल.

३) पिकस्पर्धेमध्ये सहभागी लाभार्थीच्या स्वतःच्या शेतावर त्या पिकाखाली किमान ४० आर क्षेत्रावर सलग लागवड असणे आवश्यक आहे.

**अर्ज करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे**

१) विहित नमुन्यातील अर्ज (प्रपत्र-अ)

२) ठरवून दिलेले प्रवेश शुल्क भरल्याचे चलन.

३) ७/१२, ८-अ चा उतारा.

४) जात प्रमाणपत्र (आदिवासी असल्यास)

५) पिकस्पर्धेसाठी शेतकऱ्याने संबंधित ७/१२ वरील घोषित केलेल्या क्षेत्राचा चिन्हांकित केलेला नकाशा.

**अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख**

रब्बी हंगामामध्ये पीक स्पर्धेची अर्ज दाखल करण्याची तारीख खालील प्रमाणे राहील.

ज्वारी, गहू, हरभरा, करडई व जवस : ३१ डिसेंबर

**स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क**

पीकनिहाय सर्वसाधारण गटासाठी रक्कम रु.३००/- राहील व आदिवासी गटासाठी रक्कम रु.१५०/- राहील.

उपरोक्त नमुद पिकांच्या क्षेत्रात आणि उत्पादनात वाढ व्हावी याकरीता जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी पिकस्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात येत आहे.

पिकस्पर्धेबाबत अधिक माहितीसाठी शेतकरी बंधु-भगिनींनी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, तसेच महाराष्ट्र शासन कृषी विभागाचे संकेतस्थळला भेट द्यावी.

### बक्षिस स्वरुप

तालुकास्तर, जिल्हास्तर व राज्यस्तरावरील पिकस्पर्धा निकाल प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पिकस्पर्धा विजेते निवडण्यात येतील.

| स्पर्धा पातळी | पहिले | दुसरे | दुसरे बॉक्स करने |
|---|---|---|---|
| तालुका पातळी | ५,००० | ३,००० | २,००० |
| जिल्हा पातळी | १०,००० | ७,००० | ५,००० |
| राज्य पातळी | ५०,००० | ४०,००० | ३०,००० |

वरील बक्षिस रक्कम सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी सारखीच राहील.




## संत्र्याच्या सालीचा असा करा वापर

**दि.३० विदर्भ प्रजासत्ताक**

हिवाळ्यात संत्री भरपूर प्रमाणात खाल्ली जातात. चवीने गोड- आंबट लागणारे हे फळ आरोग्यासाठी फायदेशीर मानले जाते. संत्र्याचा आस्वाद घेतल्यानंतर संत्र्याची सालं मात्र, आपण निरूपयोगी समजून फेकून देतो. पण, तुम्हाला कदाचित हे माहित नसेल संत्र्याच्या सालींचा वापर पुनर्वापर करता येतो. संत्र्याच्या सालीचा वापर त्वचेची काळजी, साफसफाई आणि स्वयंपाक घरापासून ते गार्डनपर्यंत करता येतो. त्यामुळे जाणून घेऊयात, संत्र्याच्या सालीचा पुनर्वापर कसा करावा,

**स्प्रे** –तुमच्या घरात मुंग्या, डास आणि झुरळ झाले असतील तर संत्र्याच्या सालींपासून तुम्हाला बग स्प्रे बनवता येईल. बग स्प्रे बनवण्यासाठी सुकवलेल्या संत्र्याची साले घ्यावी. यानंतर ही साले पाण्यात मिक्स करावी. तयार स्प्रे बाटलीत भरून ठेवा. तुमचा बग स्प्रे तयार झाला आहे.

**भांडी स्वच्छ करा** – स्टेनस्टिलची भांडी स्वच्छ करण्यासाठी तुम्हाला संत्र्याची साले वापरता येतील. स्टिलच्या भांड्यावर जेथे डाग असतील तेथे संत्र्याची साले घासा. या ट्रिकने संत्र्याची साले पुन्हा नव्यासारखी चमकू लागतील.

**क्लिनर** –घर स्वच्छ करण्यासाठी तुम्हाला क्लिनर तयार करता येईल. संत्र्याच्या सालींपासून तयार करण्यात आलेला स्प्रे किटाणू नष्ट करेलच शिवाय घरही सुगंधित होईल.

**खत** –संत्र्याची साले खत म्हणून वापरता येतात. सालींपासून खत तयार करण्यासाठी सुकलेल्या सालांची पेस्ट तयार करून घ्यावी. यानंतर तयार पेस्ट खतात मिक्स करावी. या खतामुळे झाडांची वाढ होण्यास मदत होईल आणि किटकांचा प्रभावही कमी होईल.



**केसांसाठी फायदेशीर** – खोबरेल तेलात संत्र्याच्या सालीची पावडर मिक्स करून लावल्याने केसांची समस्या दूर होते.

**त्वचेसाठी फायदेशीर** – संत्र्याच्या सालीमध्ये वृद्धत्वविरोधी गुणधर्म आढळतात. ज्यामुळे त्वचेला फायदा होतो. हे ब्लॅक हेड्स, मुरुम आणि डागाची समस्या कमी करतात. यासाठी तुम्हाला संत्र्याची साल किंवा पावडर त्वचेवर लावायची आहे.

# सोयाबीन साठवणुकीवेळी 'या' पाच गोष्टी लक्षात ठेवा, जाणून घ्या सविस्तर

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक**

सध्या सोयाबीनचे अपेक्षित बाजारभाव मिळत नसल्याने शेतकरी चिंतेत आहेत. त्यामुळे अनेक शेतकरी सोयाबीन साठवण्यावर भर देत आहेत. मात्र सोयाबीनची साठवणूक करताना देखील विशेष काळजी घ्यावी लागणार आहे. साठवताना काही महत्त्वाच्या गोष्टी लक्षात ठेवाव्या लागतात. सोयाबीन हे अत्यंत कच्चे उत्पादन आहे. जर त्यात जास्त ओलावा असेल किंवा दाणे जास्त कोरडे असतील तर दोन्ही परिस्थितींमध्ये धोका आहे. अशा परिस्थितीत सोयाबीनची योग्य प्रकारे साठवणूक कशी करावी हे जाणून घेऊया.

**आर्द्रता तपासा**– काढणीच्या वेळीसोयाबीनची आर्द्रता१३ टक्क्यांपेक्षा जास्त असल्यास सर्वप्रथम ती ओलावा कमी करण्यासाठी उपाययोजना कराव्यात. ओलावा कमी करण्यासाठी सर्वप्रथम उन्हात वाळवू शकता. लक्षात ठेवा की ओलावा कमी केल्याशिवाय सोयाबीनची साठवणूक करू नका. कारण ते खराब होण्याची शक्यता असते.

**कोरडी जागा आवश्यक**– सोयाबीन कोरड्या आणि किंचित थंड ठिकाणी साठवणूक करावी. कोरड्या जागेमुळे, उत्पादनास बुरशीजन्य रोगाचा त्रास होणार नाही. हलक्या थंडीमुळे सोयाबीनच्या दाण्यातील उष्णता वाढणार नाही. यामुळे धान्य खराब होण्यापासून बचाव होईल. तापमानावर लक्ष ठेवा. जर ते वाढले किंवा हवेतील आर्द्रता वाढली तर उत्पादन बाहेर काढा.




**कीटक आणि रोगांवर लक्ष ठेवा**– सोयाबीन साठवण्यापूर्वी किंवा नंतर त्यावर हल्ला करणाऱ्या कीटकांवर लक्ष ठेवा. यामुळे उत्पादनाचे सर्वाधिक नुकसान होते. उत्पादनात कोणत्याही प्रकारचे कीड दिसल्यास तात्काळ उपाययोजना करा. अन्यथा साठवलेले सर्व धान्य खराब होऊ शकते. तसेच साठवलेल्या सोयाबीनवर लक्ष ठेवा.

**हाताळणीत सावधगिरी बाळगा**– सोयाबीन हाताळताना खूप काळजी घ्यावी लागते. उत्पादनाची साठवणूक करण्यापूर्वी अनेक गोष्टी लक्षात ठेवाव्या लागतात. जर तुम्ही सोयाबीन गोण्यांमध्ये भरून ठेवत असाल त्या ठिकाणची जागा कोरडी करा. सोयाबीनची गोणी अचानक फोडू नका, कारण त्यामुळे दाणे फुटतात. त्यामुळे नुकसान वाढण्याची शक्यता वाढते.

**जास्त सुकवू नका, कारण...** सोयाबीन साठवून ठेवण्यापूर्वी जर तुम्ही ग्रेन ड्रायरने वाळवत असाल तर खबरदारी घ्यावी लागेल. उत्पादन जास्त सुकवू नका कारण, त्यामुळे दाणे फुटू शकतात. जास्त कोरडे केल्याने देखील धान्य आकुंचन पावते. जर तुम्हाला नैसर्गिक हवेने सोयाबीन सुकवायचे असेल तर सच्छिद्र असलेली जागा वापरा. जेणेकरून हवा सहज येऊ जाऊ शकेल. ही हवा सोयाबीनला सुकवण्याव्यतिरिक्त, निरोगी आणि ताजी ठेवण्यास मदत करेल.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. ३० नोव्हेंबर २०२४ शहर/ग्रामिण


# पैशांच्या वादातून जवानाने वृद्धाचे मुंडके कापून ३० किमी.वर फेकले

## अकोलीत आढळलेल्या डोके नसलेल्या मृतदेहाची ओळख पटली

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.३० अमरावती–** शहरातील अकोली परिसरातील खुल्या भूखंडात एका व्यक्तीचे डोके नसलेला मृतदेह गुरुवारी आढळला होता. क्रूरतेचा कळस गाठलेल्या या घटनेने खळबळ उडाली होती. दरम्यान या मृतकाची शुक्रवारी (दि. २९) दुपारी ओळख पटली. त्यानंतर थोड्याच वेळात मारेकऱ्याचे नाव समोर आले. मृतक व्यक्ती व मारेकरी एकाच गावातील असून त्यांच्यात आर्थिक व्यवहार होते. याच व्यवहारातून भारतीय सैन्य दलातील ३० वर्षीय जवानाने त्या वृद्धाचा क्रूरपणे खून केला. त्यानंतर या जवानाने वृद्धाचे मुंडके धडापासून वेगळे करून ३० कि.मी. सोबत नेले आणि आसेगाव परिसरात टाकल्याचे समोर आले. शुक्रवारी सायंकाळी मारेकरी जवानाला पोलिसांनी ताब्यात घेतले होते.दुर्योधन



बाजीराव कडू (६५, रा. भूगाव, अचलपूर) असे मृताचे, तर निकेतन कडू (३०, रा. भूगाव, अचलपूर) असे आरोपीचे नाव आहे. दुर्योधन आणि निकेतन हे नातेवाईक आहेत. निकेतन भारतीय सैन्य दलात कार्यरत आहे. मागील वर्षी निकेतनने दुर्योधन कडू यांच्याकडून काही रक्कम उधारीवर घेतली होती. याच पैशांवरून त्यांच्यात शाब्दिक वाद होते. दरम्यान निकेततने पोलिसांना सांगितले, की मी उधार घेतलेली रक्कम दुर्योधन यांना दिली होती, तरीही ते वारंवार व्याज व इतर रकमेसाठी मानसिक त्रास देत होते. दरम्यान, गुरुवारी सकाळी साडेदहा वाजता मी तुमची सर्व रक्कम अमरावतीत देतो म्हणत निकेतनने दुर्योधन कडू यांना दुचाकीवरून अमरावतीत आणले . शहरालगतच्या अकोली भागातील खुल्या भूखंडापासून ते दोघेही दुचाकीने जात होते. त्यावेळी दुर्योधन यांनी दुचाकी थांबव, मला लघुशंकेला जायचे आहे असे त्याला म्हटले. ते लघुशंकेसाठी उतरताच निकेतनने बॅगमधून सत्तूर काढला आणि दुर्योधनचा गळा चिरला. तसेच धडापासून डोके वेगळे करून टाकले. त्यानंतर मृतदेह त्याच ठिकाणी झाडाझुडपात लपवून ठेवला आणि दुर्योधन यांचे डोके बॅगमध्ये ठेवून २५ ते ३० किलोमीटर अंतर दुचाकीवरून आसेगाव परिसरातील एका नाल्यालगत टाकला. पोलिसांनी शुक्रवारी सायंकाळी निकेतनला ताब्यात घेतल्यानंतर त्याने डोके कुठे टाकले याची माहिती दिली. त्या आधारे निकेतनला ताब्यात घेतले आहे.

### निकेतनला ताब्यात घेतले

मृतक दुर्योधन कडू व निकेतन यांच्यात आर्थिक व्यवहार होते. त्यामधूनच हे खून प्रकरण घडल्याचे समोर येत आहे. निकेतनने डोके आसेगाव भागात टाकल्याचे सांगितले होते. तेथे शोधले असता त्या मृतदहाचे डोके साडपले आहे. **–गणेश शिंदे,** पोलिस उपायुक्त.

### आसेगाव परिसरात मिळाले शिर

निकेतन दसऱ्यापासून ड्युटीवर गेलाच नाही निकेतन हा २०१५ मध्ये भारतीय सैन्य दलात रुजू झाला होता. तो सध्या पंजाबमधील अंबाला कँट या ठिकाणी कार्यरत होता. दरम्यान दसऱ्याला तो गावी सुटीवर आला. त्यानंतर तो ड्युटीवर रुजू होण्यासाठी गेला नव्हता. त्यावेळेपासून तो गावातच होता. दुर्योधन कडू हे उधारीच्या पैशांवरून मानसिक त्रास देत असल्यामुळे हे कृत्य केल्याचे प्रथमदर्शनी समोर येत आहे.

# बहिरमची यात्रा २० डिसेंबरपासून, साफसफाईसह इतर कामांना प्रारंभ

## १९ डिसेंबरला मंदिरात पूजा, सर्वाधिक काळ चालणारी यात्रा





विदर्भ प्रजासत्ताक

**दि.३०अमरावती–** मध्य प्रदेश आणि महाराष्ट्राच्या सीमेवर असलेल्या जिल्ह्यातील बहिरम येथे श्री बहिरम बाबांची यात्रा विदर्भातील सर्वाधिक काळ चालणारी यात्रा म्हणून प्रसिद्ध आहे. या यात्रा महोत्सवाला यंदा २० डिसेंबरपासून सुरुवात होत आहे. दरम्यान यात्रा सुरू होण्याच्या एक दिवसाआधी १९ डिसेंबरला मंदिरात होमहवन व पूजा करण्यात येणार असल्याची माहिती ट्रस्टचे सदस्य किशोर ठाकरे यांनी दिली आहे.बहिरम बाबांची यात्रा सर्वदूर प्रसिद्ध आहे. दरम्यान या यात्रेच्या देखरेखीची जबाबदारी अमरावती जिल्हा परिषदेकडे आहे. त्यामुळे यात्रा सुरू होण्यापूर्वी त्या ठिकाणी चांदूर बाजार पंचायत समितीचे विस्तार अधिकारी ईश्वर सातांगे यांनी आवश्यक त्या तयारीसाठी पाहणी केली व तयारी सुरू केली आहे. अशी माहिती यात्रा व्यवस्थापक निखिल नागे यांनी दिली. तसेच ९ ते ११ डिसेंबरपर्यंत या ठिकाणी यात्रेतील दुकानांसाठी जागेची लिलाव प्रक्रिया पंचायत समिती चांदूर बाजारकडून राबवण्यात येणार आहे. बहिरम हे ठिकाण मध्य प्रदेशच्या सीमेवर असल्याने त्या ठिकाणी महाराष्ट्रासह मध्य प्रदेशातूनही मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी राहते. पूर्वी बहिरम यात्रेत मोठ्या प्रमाणात 'तमाशा' सादरीकरण व्हायचे, मात्र मागील काही वर्षांपूर्वी माजी आमदार बच्चू कडू यांनी यात्रेतील तमाशा केंद्र बंद केले. त्याऐवजी यात्रेत सर्वसामान्यांच्या सोईच्या दृष्टीने प्रशासकीय यंत्रणा एकाच ठिकाणी आणून नागरिकांना शासकीय कामासाठी मदत होईल, असा स्तुत्य उपक्रम सुरू केला होता. बहिरम या ठिकाणी शिरसगाव कसबा पोलिसांचा चोख बंदोबस्त असतो. या यात्रेचा कालावधी जवळपास एक महिन्याहून अधिक असतो. त्यामुळे यात्रा काळातील महिनाभरातील प्रत्येक शनिवारी व रविवारी भाविकांची चिक्कार गर्दी या ठिकाणी राहते.हंडीतील मटन अन् रोडगे प्रसिद्ध यात्रेत हंडीतील मटन आणि रोडगे प्रसिद्ध आहे. खवय्यांसाठी ही यात्रा एक मेजवानी ठरते. हंडीतील मटन किंवा वांग्याची भाजी आणि रोडग्याचा स्वाद घेण्यासाठी दूरदूरवरून भाविक या ठिकाणी येतात.

# क्रीडा क्षेत्राला प्रशासनाची सर्वतोपरी मदत-जिल्हाधिकारी सौरभ कटियार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०अमरावती–** अमरावती,जिल्ह्यात क्रीडा संस्कृतीचा विकास होणे आवश्यक आहे. यासाठी जिल्हा प्रशासनातर्फे पूर्ण सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी दिली. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळात जिल्हा प्रशासनातर्फे नेमबाजीचे अत्याधुनिक साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. यानिमित्त आयोजित कार्यक्रमात संस्थेचे उपाध्यक्ष श्रीकांतराव चेंडके, सचिव माधुरी चेंडके, शासकीय ज्ञान विज्ञान संस्थेचे संचालक सतिश माळोदे, डॉ. एस. एस. कुमार, डॉ. एस. सी. देशपांडे, प्राचार्य श्रीनिवास देशपांडे आदी उपस्थित होते.श्री. कटियार यांनी, देशामध्ये आज क्रिडा क्षेत्रात मोजक्या चांगल्या संस्था कार्यरत आहे. यात एचव्हीपीएमचे नाव आहे. संस्थेचा जुना इतिहास आहे. संस्थेने परंपरा आणि आदर्श कायम ठेवली आहे. संस्थेने नेमबाजीसाठी सुविधा निर्माण करून दिली आहे. त्यामुळे प्राविण्यप्राप्त खेळाडू तयार होऊन पदके प्राप्त करीत आहे. प्रशासन खेळाडूंना चांगल्या सुविधा प्राप्त करून देण्यासाठी कटिबद्ध आहे. खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय पातळीवर उत्कृष्ट प्रदर्शन करून पदके प्राप्त करून संस्थेला गौरव प्राप्त करून



द्यावा, असे आवाहन केले.

श्री. माळोदे यांनी संस्थेने नेमबाजीसाठी कमी वेळेत कायापालट करून खेळाडूंसाठी सुविधा निर्माण केली आहे. संस्थेने मिशन ऑलिंपिकचे उद्दिष्ट ठेवले आहे, यासाठी पूर्ण सहकार्य करण्यात येईल, असे सांगितले.श्रीमती चेंडके यांनी प्रास्ताविकातून सर्वांच्या मदतीने नेमबाजीची सुविधा निर्माण झाली आहे. या खेळासाठी उपलब्ध असलेल्या सुविधेतून खेळाडूंनी नेत्रदिपक यश मिळविले आहे. यानंतरही संस्थेतर्फे खेळाडूंना चांगल्या सुविधा देण्यात येणार असल्याचे सांगितले. तसेच अत्याधुनिक साहित्य देण्यात आल्याबद्दल आभार मानले. यावेळी जान्हवी मानतकर यांच्यासह विविध स्पर्धांमध्ये पदकप्राप्त खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. आनंद महाजन यांनी सूत्रसंचालन केले.

# संपुर्ण कुटुंबावर गुन्हा दाखल करण्याची भीती दाखवून पाच लाखांची मागणी

## तडजोडीअंती ५० हजारात फिक्स ! लाचखोर दोन पोलीस कर्मचारी 'एसीबी'च्या जाळ्यात

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.३०अमरावती–** संपुर्ण कुटुंबावर गुन्हा दाखल करण्याची भीती दाखवून साहेबांना पाच लाख रुपये द्यावे लागतिल, अशी बतावणी करून ५० हजार रुपयांच्या लाचेची मागणी कराणाऱ्या दोन पोलीस कर्मचाऱ्यांना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने २९ नोव्हेंबर रोजी अटक केली. लाचखोर दोन्ही पोलीस अंमलदार हे स्थानिक फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात कार्यरत आहेत.एसीबीनुसार, सतीश सुभाष सावरकर (३९, रा. शासकीय वसाहत, कांतानगर) व अनिरुद्ध नामदेवराव भीमकर (३३, रा. कैलासनगर) अशी अटक करण्यात आलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांची नावे आहेत. या प्रकरणातील तक्रारदाराच्या मंगलधाम परिसरातील न्यू कॉलनी येथील जुन्या घराच्या नूतनीकरणाचे काम सुरू आहे. दामिनी पथकाच्या कर्मचाऱ्यांनी तेथे जावून तक्रारदार यांना तू इथे अवैध धंदे चालवितो, असे म्हटले. तथा त्यांच्या घराचे फोटो काढले. त्यानंतर तक्रारदार यांच्या भावाला फ्रेजरपुरा ठाण्यात नेण्यात आले. तक्रारदार यांनाही पोलीस ठाण्यात येण्यास सांगण्यात आले. त्यानंतर काही वेळाने पोलीस शिपाई सतीश सावरकर याने तक्रारदार यांना मोबाइलवर कॉल केला. तुझ्या भावावर व संपूर्ण कुटुंबावर गुन्हा दाखल करतो, यातून तुला वाचायचे असेल, तर साहेबांना ५ लाख रुपये द्यावे लागतील, असे तो तक्रारदाराला म्हणाला.



त्यावर तक्रारदाराने येथील लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली.

**पडताळणीत लाचेची मागणी निष्पन्न–** तक्रारीवरून लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने केलेल्या पडताळणीत पोलीस शिपाई सतीश सावरकर व अनिरुद्ध भीमकर यांनी तक्रारदार यांना त्यांच्या भावावर व संपूर्ण कुटुंबावर गुन्हा दाखल करतो, अशी भीती दाखवून गुन्हा दाखल न करण्यासाठी तडजोडीअंती ५० हजार रुपयांच्या लाचेची मागणी करून ती स्वीकारण्याची तयारी दर्शविल्याचे निष्पन्न झाले. परंतु, सावरकर व भीमकर यांना तक्रारदारांवर संशय आल्याने त्यांनी लाचेची रक्कम स्वीकारली नाही. मात्र, लाचेची मागणी करून ती स्वीकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाल्याने लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने शुक्रवारी सतीश सावरकर व अनिरुद्ध भीमकर यांना अटक केली. त्यांच्याविरुद्ध फ्रेजरपुरा ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई पोलीस निरीक्षक योगेशकुमार दंदे व केतन मांजरे, आशिष जांभोळे, प्रमोद रायपुरे, शैलेश कडू, उपेंद्र थोरात, चंद्रकांत जनबंधू यांनी केली.

# विद्यार्थ्यांसाठी डिसेंबरमध्ये करिअर मार्गदर्शन मेळावा

## जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी बी. वैष्णवी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०अकोला,** जागतिक बँक पुरस्कृत स्टार प्रकल्प व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या सहकार्याने जिल्ह्यातील इयत्ता नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन मेळावा डिसेंबरच्या दुस–या आठवड्यात आयोजित करण्यात येईल, असे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी बी. वैष्णवी यांनी सांगितले.इयत्ता नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनिवडी, क्षमता, व्यक्तिमत्व वैशिष्ट्ये याबाबत जाणीव निर्माण करण्याबाबत समुपदेशक व तज्ज्ञांमार्फत समुपदेशन करण्यात येणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्याला आपल्या क्षमता कळून नोकरी व व्यवसायाची निवड निवड करण्यास मदत होईल.



डिसेंबरमध्ये दुस–या आठवड्यात मेळावा घेण्याचे नियोजन असून, मेळाव्याच्या पहिल्या दिवशी विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन, तसेच दुस–या दिवशी जिल्ह्यातील नियोक्त्यांमार्फत व्यवसाय नियुक्तीसंदर्भात मुलाखती व नियुक्ती देण्याचे निश्चित करण्यात आले आहे. सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करून मेळावा यशस्वी करण्याचे निर्देश श्रीमती वैष्णवी यांनी दिले.

# बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा; पावसाचा अंदाज

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३० रत्नागिरी : –** बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे राज्यातील किमान तापमानात हळुवारपणे वाढ होत असून, २८ नोव्हेंबरपासून ते १९ डिसेंबरपर्यंत तीन आठवडे राज्यात ढगाळ वातावरणासह हलक्या पावसाचा अंदाज आहे. त्यामुळे राज्यात थंडी कमी राहील, असा अंदाज हवामान शास्त्रज्ञांनी व्यक्त केला आहे.राज्यात गेले चार ते पाच दिवस कडाक्याची थंडी पडण्यास सुरुवात झाली आहे. मात्र, बंगालच्या उपसागरातील कमी दाबाच्या पट्ट्यामुळे राज्यात ढगाळ वातावरण आणि हलक्या पावसाचा अंदाज आहे. राज्यात बाष्पयुक्त वारे वेगाने येत असल्याने २८ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत हलक्या पावसाचा अंदाज आहे. त्यामुळे पुन्हा थंडी कमी होऊन किमान तापमानात सरासरीपेक्षा जास्त वाढ होण्याचा अंदाज आहे. त्याची सुरुवात २३ नोव्हेंबरच्या पहाटेपासून दिसत आहे.

# पाच लाख बालकांना जंतनाशक गोळी वितरीत होणार


## बुधवारी जंतनाशक दिन राबविणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३० अमरावती,** जिल्हा आरोग्य यंत्रणेमार्फत बुधवार, दि. ४ डिसेंबर रोजी राष्ट्रीय जंतनाशक दिन राबविण्यात येणार आहे. या दिवशी १ ते १९ वर्षातील मुलांना जंतनाशक गोळी देण्यात येणार आहे. जिल्ह्यात ५ लाख १९ हजार २३९ लाभार्थ्यांना बुधवारी जंतनाशक गोळी देण्यात येणार आहे.राष्ट्रीय जंतनाशक दिन दि. ४ डिसेंबर आणि मॉप अप दिन दि. १० डिसेंबर रोजी राबविण्यात येणार आहे. यात १ ते १९ वर्ष वयोगटातील सर्व मुला–मुलीना जंतनाशक गोळी देऊन त्यांचे आरोग्य चांगले ठेवणे, पोषण स्थिती, शिक्षण व जीवनाचा दर्जा उंचावण्यात येणार आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश असोले आणि



अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रविण पारिसे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय जंतनाशक दिन राबविला जाणार आहे. या मोहिमेत १ ते २ वर्षे वयोगटातील बालकांना अर्धा गोळीची मात्रा पावडर करून दिली जाणार आहे, तर २ ते १९ वर्षे वयोगटातील सर्वांना एक गोळी चावून खावी लागणार आहे. ही मोहिम सर्व शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, अंगणवाडी, शाळा बाह्य मुलांमध्ये राबविण्यात येणार आहे.या गोळीचा फायदा रक्ताशय ॲनिमिया कमी होतो, शाळेतील उपस्थिती नियमित होते, बालक क्रियाशील बनते. रोगप्रतिकारक शक्ती वाढते, शारीरिक व बौद्धीक वाढ सुधारते, आरोग्य चांगले राहते, अल्बेंडेझोलच्या एका



डोसमुळे जंताचा नाश होतो. या गोळीचा दुष्परिणाम नाही, ही गोळी प्रत्यक्ष खाऊ घालायची आहे. ती घरी घेऊन जाता येणार नाही. शाळाबाह्य मुलांना आशा स्वयंसेविकेमार्फत गोळीचे वाटप करण्यात येणार आहे. पालक, शिक्षक, संस्थानी मोहिम यशस्वी करावी, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने केले

# अपात्र लाडक्या बहिणींनी पडताळणीनंतर पैसे केले परत, पडताळणी सुरूच राहणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३० पुणे –** संपूर्ण महाराष्ट्रातील मतदारांवर भुरळ घालणाऱ्या 'लाडकी बहीण' योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांची पडताळणी सुरूच असून आतापर्यंत अनेक अपात्र लाभार्थ्यांनी आपले पैसेदेखील परत केले आहेत. पडताळणीची प्रक्रिया निरंतर सुरू असून अपात्र लाभार्थ्यांवर कारवाई करण्यात आली असल्याची माहिती महिला व बालकल्याण आयुक्त प्रशांत नारनवरे यांनी दिली. दरम्यान, आचारसंहितेच्या काळात उर्वरित अर्जांची छाननी प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. त्याशिवाय येत्या काही दिवसांत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांची मान्यता घेऊन योजनेच्या लाभार्थ्यांची अंतिम यादी निश्चित केली जाणार असून लवकरच पुढील हप्ताही देण्यात येणार असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. विधानसभा निवडणुकीसाठी आचारसंहिता सुरू होण्यापूर्वीपर्यंत राज्यात २ कोटी ५२ लाखांहून अधिक




लाभार्थ्यांचे अर्ज मंजूर करण्यात आले होते. तर पुणे जिल्ह्यात २० लाख ४८ हजारांहून अधिक अर्ज मंजूर करण्यात आले होते. योजनेला १५ ऑक्टोबरपर्यंत अंतिम मुदत होती. तर १६ ऑक्टोबरला आचारसंहिता जारी झाल्यामुळे नव्याने आलेल्या अर्जांची छाननी आणि मंजुरीची प्रक्रिया होऊ शकली नव्हती. त्यामुळे जिल्ह्यातील सुमारे एक लाखांहून अधिक अर्ज आचारसंहितेत अडकले होते.

मात्र, त्यापूर्वी जिल्हा प्रशासनाने ५० हजार अर्जांची छाननी करून त्याला मान्यताही दिली. याबाबत महिला व बालकल्याण विभागाची बुधवारी (दि. २७) व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे बैठक झाली. त्या वेळी महिला व बालकल्याण विभागाचे सचिव अनुपकुमार यादव यांनी अधिकाऱ्यांशी विविध मुद्यांवर चर्चा केली.

# प्रतापराव जाधवांनी माझ्या विरोधातील उमेदवाराचे काम केलं, संजय गायकवाडांचा गंभीर आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०बुलढाणा** – महाराष्ट्राच्या निकालातून चकीत करणारे आकडे समोर आलेत. यातच अनेक पराभूत उमेदवारांसोबतच विजयी उमेदवारांकडूनही दावे-प्रतिदावे केले जाताहेत. आता एकनाथ शिंदे यांचे फायरब्रँड नेते आणि नवनियुक्त आमदार संजय गायकवाड यांनी आपल्याच पक्षाचे केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधवआणि भाजपचे आमदार संजय कुटे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला.

केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधवांनी यांनी माझ्या विरोधातील उमेदवाराचे काम केल्याचा आरोप गायकवाड यांनी केला.

महाविकास आघाडीच्या दिग्गज उमेदवारांची निवडणुकीत हार झाल्याने अनेकांकडून अंतर्गत कलहांवर बोट ठेवले जातेय. तर आता महायुतीतील धुसफूससमोर येऊ लागली.

विजय खेचून आणण्यासाठी आपल्याला अंतर्गत गटबाजीला तोंड द्यावे लागल्याची खंत संजय गायकवाड यांनी व्यक्त केली. एका कार्यक्रमात बोलताना





गायकवाड यांनी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्यावर गंभीर आरोप केला. ते म्हणाले की, विधानसभा निवडणूक मी एकटाच लढलो. एकाही पक्षाचा नेत्या माझ्यासोबत नव्हता.

भाजपाचे नेतेही सोबत नव्हते. भाजपने तर माझ्या विरोधात उमेदवार निश्चीत केला. तर आमचे केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव आणि संजय कुटेंनी माझ्या विरोधातील उमेदवाराचे काम केल्याचा आरोप गायकवाड यांनी केला.

### गायकवाड यांचा अवघ्या ८०० मतांनी विजय

संजय गायकवाड यांच्या विरोधात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या जयश्री शेळके रिंगणात होत्या. या दोघांमध्ये थेट लढत झाली. जयश्री शेळके यांना ९० हजार ८१९ तर संजय गायकवाड यांना ९१ हजार ६६० मते मिळाली. संजय गायकवाड हे अवघ्या ८४१ मतांनी विजयी झाले.दरम्यान, आता गायकवाड यांनी आपल्याच केंद्रीय मंत्र्यावर थेट आरोप केल्याने बुलढाणा जिल्ह्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. आता एकनाथ शिंदे यावर काय निर्णय घेतात याकडे कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे.

# 'एससी' राखीवच्या २० सीट महायुतीकडे; भाजपने १० जागा पटकावल्या!

## दलित मतदारांची महाविकास आघाडीकडे पाठ:'

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती–** विधानसभा निवडणुकीत राज्यातल्या 'एससी'साठी राखीव असलेल्या २९ मतदारसंघात मतदारांनी महाविकास आघाडीकडे पाठ फिरवत भाजपला मते दिल्याचे समोर आले आहे. त्यामुळे महायुतीच्या पारड्यात २० जागा पडल्या.

भाजपने १०, एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेने ५, अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने ५ जिंकल्या.

'एससी'साठी राखीव मतदारसंघामध्ये महाविकास आघाडीने ९ जागा जिंकल्या. त्यात काँग्रेसला ४, ठाकरेंच्या शिवसेनेला २, शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने २ आणि १ जागा जनसुराज्य पक्षाने पटकावली. लोकसभा निवडणुकीत संविधान धोक्यात आल्याचा प्रचार राहुल गांधींनी केला. त्यामुळे विधानसभेच्या २९ पैकी २१ मतदारसंघात महाविकास आघाडीने मताधिक्क्यात आघाडी घेतली. राज्यातल्या पाचीच्या पाची राखीव जागी महाविकास आघाडीने बाजी मारली. विधानसभा निवडणुकीतही संविधान आणि अदानी या दोन मुद्यांभोवती महाविकास आघाडीचा प्रचार फिरत राहिलेला दिसला. मात्र, विधानसभेत राखीव मतदारसंघातले मताधिक्क्य महाविकास आघाडीला टिकवता आले नाही.

'अनुसचित'बहुल जागीही विजयी

भाजपने अनुसचित समाजाची लोकसंख्या जास्त असलेल्या मतदारसंघातही आघाडी घेतल्याचे दिसते. राज्यात असे ६७ मतदारसंघ आहेत. तिथे अनुसूचित समाजाची जवळपास १५ टक्केपेक्षा जास्त लोकसंख्या आहे. या मतदारसंघात भाजपने ४२ जागा पटकावल्या. अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने ८, एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेने ६ जागांवर बाजी मारली. तर या ठिकाणी महाविकास आघाडीला केवळ ८ जागांवर समाधान मानावे लागले.

**'वंचित'कडे मतदारांची पाठ**

वारंवार भूमिका बदलणाऱ्या वंचित बहुजन



विकास आघाडीकडे विधानसभा निवडणुकीत मतदारांनी पाठ फिरवल्याचे दिसले. यंदा प्रकाश आंबेडकरांनी तब्बल २०० जागा लढवल्या. मात्र, एकही उमेदवार विजयी झाला नाही. त्यांना १४ लाख मते पडली. विशेष म्हणजे २०१९ च्या तुलनेत वंचितचे मताधिक्क्य तब्बल ११ लाखांनी कमी झाल्याचे दिसले. तेव्हा त्यांना २५ लाखांपेक्षा जास्त मते मिळाली होती. यावर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीतही त्यांना १५ लाख मते मिळाली. मात्र, त्यातही घसरण झाल्याचे दिसले. दुसरीकडे रामदास आठवले, जोगेंद्र कवाडे हे दोघेही या निवडणुकीत महायुतीच्या बाजूने होते. मात्र, जागावाटपात त्यांच्या पक्षालाही एकही जागा मिळाली नाही. त्यामुळे त्यांचे उमेदवार या निवडणुकीत नव्हतेच.

काँग्रेसला सडेतोड उत्तर

लोकसभा निवडणुकीत भाजपकडून संविधानावर घाला घालण्यात येत असल्याचा आरोप राहुल गांधींनी केला. हातात संविधानाची प्रत घेऊन प्रचार केला.

असाच प्रचार महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत केला. मात्र, भाजपने हे फेक नॅरेटिव्ह असल्याचा प्रचार केला. त्याला यश आल्याचे दिसले. राहुल गांधींनी राज्यात फक्त ४ प्रचारसभा घेतल्या. तर नरेंद्र मोदींनी प्रचारफेरीसह ११ प्रचारसभा घेतल्या. अमित शहांनीही महाराष्ट्रात प्रचार केला. त्याचा परिणाम झाल्याचे दिसले.

# सीएम पदासाठी भाजपाचं धक्कातंत्र? मुरलीधर मोहोळांच्या नावाची चर्चा

## मुरलीधर मोहोळ म्हणतात चर्चा निरर्थक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०पुणे–** एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीतून माघार घेतल्यानंतर भाजपाचाच मुख्यमंत्री होणार हे अधोरेखित झालं आहे. मुख्यमंत्रिपदासाठी देवेंद्र फडणवीस यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्याचं सांगितलं जात आहे. मात्र या घडामोडी घडत असतानाच एकनाथ शिंदे यांनी गुगली टाकत त्यांच्या गावी निघून गेले आहेत. यातच आता केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांचं नाव मुख्यमंत्रिपदासाठी अचानक पुढे आलं आहे. त्यांच्या नावाची जोरदार चर्चा सोशल मीडियावर सुरू झाली आहे. या चर्चांवर स्वतः मुरलीधर मोहोळ यांनी एक्सवर पोस्ट लिहित या सर्व चर्चा निरर्थक असल्याचं म्हटलं आहे.

**कोण आहेत मुरलीधर मोहोळ?**

मोहोळ यांनी भाजपमधून राजकारणात प्रवेश केला. पक्षात त्यांनी विविध पदं



सांभाळली. मोहोळ पुणे महापालिकेत चार वेळा नगरसेवक, स्थायी समितीचे अध्यक्ष तसेच महापौर राहिले आहेत. मोहोळ यांचं कुटुंब कुस्ती क्षेत्राशी निगडीत आहे. मुरलीधर मोहोळ यांनी शिक्षणाबरोबरच कुस्तीचेही धडे गिरवले. त्यांचे आजोबा, वडील, काका आणि मोठे बंधू पैलवान आहेत.

पुण्यात प्राथमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर कुस्तीची कला शिकण्यासाठी त्यांनी कोल्हापूर गाठलं. कोल्हापुरात महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केल्यानंतर मोहोळ पुण्यात आले. यानंतर भाजपाचे दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे आणि प्रमोद महाजन यांच्या कार्यशैलीने प्रभावित होऊन त्यांनी १९९३ च्या काळात राजकारणात प्रवेश केला. याच काळात मोहोळ माजी खासदार अनिल शिरोळे यांच्या संपर्कात आले. यानंतर त्यांचा राजकारणात दबदबा निर्माण होण्यास सुरुवात झाली.

समाजमाध्यमांमधून माझ्या नावाची महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदासाठी होणारी चर्चा निरर्थक आणि कपोलकल्पित आहे. आम्ही भारतीय जनता पार्टी म्हणून लढताना महाराष्ट्र विधानसभा निवडणूक आमचे नेते देवेंद्रजींच्या नेतृत्वात लढलो. महाराष्ट्राच्या जनतेने कौलही ऐतिहासिक दिला आहे. आमच्या भारतीय जनता पार्टीत पक्षशिस्त आणि पार्टीचा निर्णय सर्वोच्च असतो. असे निर्णय पार्लिमेंटरी बोर्डात एकमतावर घेतले जातात, ना की सोशल मीडियाच्या चर्चेवर ! आणि पार्लिमेंट्री बोर्डात एकदा का निर्णय झाला, तर पार्टीचा निर्णय आमच्यासाठी सर्वोच्च असतो. म्हणूनच माझ्या नावाची सोशल मीडियात होणारी चर्चा अर्थहीन आहे.

# अद्रकाने आणले शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी; लागवडीचा खर्चही निघेना

## बाजारपेठेत आवक वाढली; अद्रकाच्या दरात २ हजारांची घसरण:

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती** जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी यंदा अद्रकाची लागवड केली. यामुळे सध्या शेतशिवारामध्ये अद्रक काढणीचा हंगाम सुरू आहे. सध्या परिसरातील शेतकऱ्यांनी काढणी केलेले अद्रक मोठ्या प्रमाणात बाजारपेठेत आले. यामुळे बाजारपेठेत सध्या अद्रकाची आवक वाढली. याचा मोठा फटका उत्पादक शेतकऱ्यांना बसला आहे. कारण यामुळे अद्रकाच्या दरात मोठी घसरण झाली आहे. अद्रकाला मिळत असलेल्या कवडीमोल भावाने



शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आणले आहे.

पूर्वी अद्रकाला असलेला ४००० रुपयांचा दर आता केवळ दोन हजारांवर आला. यामुळे लागवडीचा खर्चही निघेनासा झाला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांबरोबर व्यापारीही आर्थिक अडचणीत सापडले आहेत. नगदी पैसा मिळवून देणारे पीक म्हणून अद्रक या पिकाकडे पाहिले जाते. यामुळे काही शेतकरी लखपती तर काही करोडपती झाले आहेत. परिसरात अद्रक लागवडीला शेतकऱ्यांची मोठी पसंती आहे. असे असताना अद्रकाला या वर्षी सुरुवातीला काही दिवस चार ते साडेचार हजार रुपये भाव होता. मात्र मागील आठ दिवसांपासून अचानक अद्रकाचे भाव गडगडल्याने चार हजारांचा असलेला भाव केवळ दोन हजारांवर येऊन ठेपला आहे. त्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. तर, ज्या व्यापाऱ्यांनी चार ते साडेचार हजार रुपये दराने अद्रक खरेदी करून ठेवले आहे ते आता मार्केटमध्ये विक्रीस नेले असता व्यापारी कमी दराने मागत आहेत. यामुळे व्यापाऱ्यांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

### व्यापारीही सापडले अडचणीत

कोठाळे घाटनांद्रा परिसरात अद्रकाचे व्यापारी असून हे व्यापारी शेतीच्या बांधावर जाऊन अद्रक खरेदी करतात. खरेदी केलेल्या अद्रकाला बाजारपेठेत विक्रीसाठी काही दिवस लागतात ज्या भावाने अद्रक खरेदी केले, पुढे भाव वाढतील की कमी होतील याची काही शाश्वती नसते. भाव कमी झाले की व्यापाऱ्यांनाही मोठा तोटा सहन करावा लागतो, असे व्यापारी सुधाकरअप्पा कोठाळे यांनी सांगितले. यामुळे दरात घसरण झाल्याचे समोर आले.

# बुलडाणा आगाराला लक्ष्मी पावली; १८ कोटी ९३ लाखांचे उत्पन्न तिजोरीत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०बुलढाणा–** यंदा नोव्हेंबर महिना हा लालपरीला चांगलाच लाभदायी ठरला. दिपावलीच्या १५ दिवसांच्या कालावधीत बुलडाणा आगारातील एसटीने ३ लाख २७ हजार ४७५ कि.मी. चे अंतर कापले. या दरम्यान आगाराने तब्बल १८ कोटी ९३ लाख ५



हजार ४०९ रुपयांचे उत्पन्न मिळवले.

दिवाळीच्या दिवसांत कुटुंबासमवेत दिवाळी साजरी करण्यासाठी बाहेरगावातील अनेकजण आपआपल्या गावी आले होते. दिवाळी संपताच पुन्हा अनेकांनी परतीचा प्रवास केला. यामुळे बुलडाणा जिल्ह्यातील सातही आगारांतील एसटी स्थानकात तुफान गर्दी पाहायला मिळली. बुलडाणा जिल्ह्यात एसटीकडे जवळपास चारशे बसेस आहेत. विविध सवलतींमुळे मागील काही दिवसांपासून एसटीच्या बसेसला प्रवाशांचा प्रचंड प्रतिसाद मिळत आहे.

महामंडळाने आपल्या प्रवाशांसाठी विविध योजना सुरु केल्या आहेत. तसेच आम्ही पूर्वीच्या तुलनेत आता बसफे-या सुद्धा वाढवल्या आहे. शिवाई बस प्रवासाच्या सेवेत उपलब्ध झाली आहे. त्यामुळे प्रवाशी संख्या वाढली असल्याने उत्पन्न देखील वाढल्याचे दिसून आले. **– शुभांगी सिरसाठ, विभाग नियंत्रक.**

# विधानसभेत ७८ नवीन चेहरे, जे पहिल्यांदाच आमदार बनले

## कोणत्या पक्षाचे किती सदस्य?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० मुंबई** – यंदाच्या विधानसभेत मुंबईतील ३६ पैकी ९ जागांवर पहिल्यांदाच निवडणूक लढवून आमदार झालेले चेहरे आहेत. त्यात उद्धव ठाकरे गटाचे महेश सावंत, वरूण सरदेसाई, हारून खान, मनोज जामसुतकर यांचा समावेश आहे. महेश सावंत यांनी माहीम मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार सदा सरवणकर आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे सुपुत्र अमित ठाकरे यांचा पराभव करून आमदार बनले आहेत तर वांद्रे पूर्व मतदारसंघातून वरूण सरदेसाई यांनी महायुतीमधील राष्ट्रवादीचे उमेदवार झिशान सिद्दीकी यांचा पराभव केला.

तसेच बोरिवलीतून भाजपाचे संजय उपाध्याय, अंधेरी पूर्व मतदारसंघातून मुरजी पटेल, अणुशक्तीनगर मतदारसंघातून सना मलिक, धारावीतून ज्योती गायकवाड यासारखेही चेहरे पहिल्यांदाच विधानसभा निवडणूक लढवून



सभागृहात पोहचले आहेत. काँग्रेसमधून भाजपात आलेले माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या कन्या श्रीजया चव्हाण यांनीही भोकर विधानसभा मतदारसंघातून भाजपाकडून निवडणूक लढवली. त्यादेखील पहिल्यांदाच विधानसभा सभागृहात दिसणार आहे. अपक्ष आमदारांमध्ये शिवाजी पाटील हेही पहिल्यांदा निवडून आलेत. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाकडून स्व. आर.आर पाटील यांचे चिरंजीव रोहित पाटील हेही आमदार झाले आहेत.

दरम्यान, महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत महायुतीने दमदार कामगिरी करत २८८ पैकी २३० जागांवर विजय मिळवला तर महाविकास आघाडीला अवघ्या ४६ जागांवर समाधान मानावे लागले आहे. या निकालात भाजपाने सर्वाधिक १३२ जागा जिंकून राज्यात नंबर वनचा पक्ष बनला आहे. त्यानंतर शिवसेना ५७, अजित पवारांच्या राष्ट्रवादीने ४१ जागांवर विजय पटकावला. मविआत ठाकरे गटाला सर्वाधिक २० जागा मिळाल्या. त्यानंतर काँग्रेस १६ आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीला केवळ १० जागांवर विजय मिळाला आहे.

### शरद पवारांकडून निवडणुकीबाबत पुन्हा प्रश्नचिन्ह

# म्हणाले, निवडणूक आयोग चुकीची भूमिका घेईल, असे वाटले नव्हते; जनतेने उठाव करणे आवश्यक

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.३० पुणे–** देशामध्ये ज्या निवडणुका झाल्या त्यासंबंधीची अस्वस्थता ती सर्व भागात दिसून येत आहे. या निवडणुकीच्या निकालाबद्दल जनमत हे बाबा आढाव यांनी घेतलेल्या भूमिकेतून व्यक्त होत असल्याचा दावा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केला आहे. ज्या निवडणुका झाल्या त्या निवडणुकीमध्ये सत्तेचा गैरवापर आणि पैशाचा महापूर दिसून आला. तो यापूर्वी कधीही बघितला नव्हता. स्थानिक पातळीवरील निवडणूक असतात, त्यामध्ये अशा तक्रारी कुठे न कुठे ऐकायला मिळतात. मात्र संपूर्ण राज्याची आणि देशाची निवडणूक असताना एवढ्या मोठ्या प्रमाणात पैसा आणि सत्तेचा गैरवापर हा करून निवडणुकीची सर्व यंत्रणा हातात घ्यायची, असे चित्र यापूर्वी कधीही दिसले नव्हते, असे देखील पवार यांनी म्हटले आहे. असेच काही या निवडणुकीत महाराष्ट्रात घडले आहे आणि त्याचा परिणाम होऊन लोकांची अस्वस्थता वाढली असल्याचे पवार यांनी म्हटले आहे.मला जे लोक भेटले त्या सर्वांना जयप्रकाश नारायण यांची आठवण आली. लोकांमधील असलेली अस्वस्थता पाहूनच बाबा आढाव यांनी पुढाकार घेतला आहे. त्यामुळे एक प्रकारचा दिलासा मिळाला असल्याचे लोकांना वाटते. राष्ट्रीय कर्तव्य आणि देशाची आवश्यकता असल्यामुळे त्यांनी ही भूमिका घेतली. मात्र त्यांनी एकट्याने भूमिका घेणे हे योग्य नाही. या विरोधात जनतेने उठाव करणे आवश्यक असल्याचे पवार यांनी म्हटले आहे.

# शिंदे गटाचे उमेदवार अभिजित अडसूळ यांच्या सह दर्यापूर मतदार संघात १४ जणांची अनामत रक्कम जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०दर्यापूर**

विधानसभा निवडणुकीत वैध मतांच्या तुलनेत १/६ मते न मिळालेल्या उमेदवारांची अनामत रक्कम जप्त केली जाते. दर्यापूर मतदार संघात थेट निवडणूक लढविणाऱ्या एकूण १६ उमेदवारांपैकी १४ जणांची अनामत रक्कम जप्त झाली आहे. यात शिंदे शिवसेनेचे कॅप्टन अभिजित अडसूळ यांचाही समावेश असल्याची माहिती निवडणूक विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली.दर्यापूर मतदार संघात २ लाख ८ हजार ५५० मतदारांनी हक्क बजावला. विजयी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाऊ उमेदवार गजानन लवटे यांना ८७ हजार ७४९ मते मिळाली तर दुसऱ्या क्रमांकाची ६८ हजार ४० मते युवा स्वाभिमानी पार्टीचे उमेदवार माजी आमदार रमेश बुंदेले यांना मिळाली. तर शिंदेसेनेचे उमेदवार अभीजीत अडसूळ यांना २३ हजार ६३२ मते मिळाली. निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार १/ ६ अर्थात १६.६६ टककेपेक्षा कमी मते मिळालेल्या उमेदवारांची अनामत जप्त केली जाते. यात



शिंदेसेनेचे उमेदवार अभिजीत अडसूळ यांना ११.३३ टक्के मते असल्याने त्यांचीही५ हजार रुपयांची अनामत जप्त होईल. तसेच वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अंकुश वाकपांजर, प्रहार जनशक्ती पार्टी अरुण वानखडे, बहुजन समाज पार्टी नागोराव हंबर्डे, पीपल्स पार्टी ऑफ इंडिया (डेमोक्रेटिक) नाजुक चौरपगार, आरपीआय (ए) कैलास मोरे, जन जनवादी पार्टी सुमित्रा गायकवाड, अपक्ष उमेदवार डॉ. सुजाता आठवले, ॲड. संजय वानखडे, ॲड. राजू कलाने, निलेश राक्षसकर, रविकिरण तेलगोटे, कांचनमाला वानखडे, मनोहर चौथमल या सर्व उमेदवारांची अनामत जप्त होईल, अशी माहिती निवडणूक कार्यालयाच्या सूत्रांनी दिली आहे.

# आंतरशालेय राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेसाठी अभिराज शिरभातेची निवड

## अमरावतीच्या शिरपेचात मानाचा तुरा, महाराष्ट्राच्या संघात समावेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

बिहार राज्यातील पाटणा येथे होणाऱ्या आंतरशालेय राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेसाठी पोदार इंटरनॅशनल शाळेचा विद्यार्थी अभिराज प्रफुल्ल शिरभाते याची निवड झाली असून तो महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करणार आहे. अभिराजच्या निवडीने अंबानगरी अमरावतीच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवल्या गेला असून त्याचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे. १४ वर्षाआतील गटात आंतरशालेय क्रिकेट स्पर्धेत जिल्हा व विभागस्तरावर उत्कृष्ट कामगिरी बजाविलेला डावखुरा फलंदाज अभिराज शिरभातेने राज्यस्तरीय स्पर्धेत देखील चमकदार कामगिरी केली होती. त्याच्या या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत त्याची निवड चाचणीसाठी




निवड करण्यात आली होती.वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट येथे पार पडलेल्या निवड चाचणीमध्ये अभिराजने उत्कृष्ट फलंदाजी करीत निवडकर्त्यांचे लक्ष वेधून घेतले होते. निवडकर्त्यांनी अभिराजच्या फलंदाजीच्या शैलीची प्रशंसा करीत त्याचा महाराष्ट्राच्या संघात समावेश केला. बिहार राज्यातील पाटणा येथे होणाऱ्या आंतरशालेय राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेत तो महाराष्ट्राच्या संघाचे प्रतिनिधित्व करणार आहे. अभिराज शिरभाते हा संत गजानन क्रिकेट अकादमीचा विद्यार्थी खेळाडू असून तो संदीप गावंडे, निलेश धर्माळे यांच्या प्रशिक्षणाखाली नियमित सराव करतो, अभिराजने आपल्या यशाचे श्रेय वडील प्रफुल्ल शिरभाते, आई रंजना शिरभाते, पोदार स्कूलच्या प्राचार्य मनीषा संगर, प्रा. डॉ. विनोद कपिले, आजोबा प्रभाकरराव शिरभाते, आजी वंदना शिरभाते, विठ्ठलराव कपिले, रजनीताई कपिले व आपल्या प्रशिक्षकांना दिले आहे. सदर स्पृहणीय यश मिळविल्याबद्दल अभिराज शिरभातेचे सारिका रवाळे ,संजय रवाळे, स्मिता लोखंडे, निलेश लोखंडे(अमेरिका) , अन्वी रवाळे,जानवी रवाळे, पृथ्वीराज लोखंडे, सहयोग फाउंडेशनचे अध्यक्ष अमोल चवणे, सचिव मंगेश तायडे, संघटक संजय बनारसे यांनी अभिनंदन केले आहे.


# मजुरांअभावी शेत झाले कापसाचे पांढरे रान

## कापूसवेचणीला मजूर मिळेनात सुरुवातीलाच कापूस वेचणीचे दर वधारले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० अमरावती**

कापूस हे शेतकऱ्यांचे नगदी पीक आहे. त्यामुळे शेतकरी मोठ्या प्रमाणात कापूस पिकाची लागवड करतात. यंदा बाहेरील मजूर कापूसवेचणीला आले नाहीत; त्यामुळे लाखमोलाचे पांढरे सोने मजुरांअभावी शेतातच असून, मजूर मिळत नसल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. त्यामुळे शेतकरी मजुरांच्या शोधत फिरताना दिसत आहेत.

कापूस उत्पादक शेतकऱ्यांची व्यथा संपायला तयार नाही. कधी निसर्गाची उदासीनता, तर कधी शासनाचे शेतकरीविरोधी धोरण कास्तकारांना मारक ठरले आहे. उत्पादनखर्च जास्त व उत्पादन कमी अशी शेतकऱ्यांची बिकट अवस्था झाली आहे. शेतकरीदिवसेंदिवस महागाईच्या तडाख्यात भरडला जात आहे. नापिकीने शेतकऱ्यांवर कर्जाचा डोंगर वाढत चालला आहे. कापूस वेचणीला आलाआहे. शेतकऱ्यांना कापूसवेचणी अजूनही मजूर मिळत नसल्यानेमजूर मिळणे कठीण झाले आहे.कापूस झाडावरच मातीमोल होण्याचा धोका निर्माण झाला आहे. सध्या शेत कापसाचे पांढरे रान झाल्याची स्थिती चांदुर बाजार



परिसरात आणि तालुक्यात दिसून येत आहे.

**१० रुपये किलोप्रमाणे कापूसवेचणी**

कापूस पिकावर होणारा खर्च मोठा आहे. सुरुवाती-पासून शेतकऱ्यांना कापूस पिकावर जास्त खर्च करावा लागतो. त्या तुलनेत कापूस शेतकऱ्यांना परवडत नाही. यंदा कापूसवेचणी करायला मजूर मिळत नसल्याने १० रुपये प्रतिकिलोप्रमाणे कापूस वेचणी करावी लागत आहे किंवा बाहेरून ऑटोने मजूर आणून कापूसवेचणी करावी लागत आहे.

# ॲग्रोव्हिजन शेतकरी फलोत्पादन २०२४ अवार्डने पुष्पक खापरे सन्मानित



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

ॲग्रोव्हिजन मध्ये शेती क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या शेतकऱ्यांचा ॲग्रोव्हिजन मध्ये अवार्ड देवून सन्मान करण्यात येतो. यावर्षीही हा सन्मान सोहळा. सन्मानपत्र, रोख रक्कम आणि गौरवचिन्ह असे पुरस्काराचे स्वरुप होते.

पुरस्काराचे गटामध्ये सोयाबीन उत्पादन गट ,दुग्धोत्पादन गट, रेशीम शेती/ मधमाशी पालन गट ,बेस्ट एक्सटेंशन वर्कर केवीके गट, फलोत्पादन गट असे पाच पुरस्कार देण्यात आले.मध्य भारतातील सर्वात मोठे कृषी प्रदर्शन म्हणून ओळख असलेल्या ग्रोवीजन पी डी के व्ही मैदान दाभा नागपूर येथे आयोजित करण्यात आले होते.

पुष्पक श्रीरामजी खापरे चांदूरबाजार यांना ग्रोव्हिजन प्रगतशील शेतकरी २०२४ फलोत्पादन पुरस्कार ॲग्रो विजन चे मुख्य प्रवर्तक केंद्रीय रस्ते विकास परिवहन मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते देण्यात आला. या वेळी अरुणाचल प्रदेशचे फलोत्पादन पशुसंवर्धन मत्स्य नागरी पुरवठा मंत्री गॅब्रीयल.डि. वांगसु यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मंचकावर ज्येष्ठ नेते रामदास तडस केंद्रीय लिंबूवर्गीय संस्था के संचालक डॉ.दिलीप घोष आयोजन सचिव रविजी बोरकर मनोजजी जवंजाळ प्रशांतजी कुकडे श्रीधररावजी ठाकरे हे सर्वजण उपस्थित होते. पुष्पक खापरे यांना हा पुरस्कार फलोत्पादन गटामधून देण्यात आला. या प्रदर्शनी ची वैशिष्ट्य म्हणजे या प्रदर्शनीत नागपूर महाराष्ट्र मध्य प्रदेश तेलंगणा राज्यातील शेतकऱ्यांनी भेट दिली. या कृषी प्रदर्शन मध्ये २लाख शेतकऱ्यांनी ड्रोन, इलेक्ट्रॉनिक ट्रॅक्टर संत्रा, दुग्ध यांत्र विविध प्रकारची बियाणे, यांत्रिकीकरण बचत गट या सर्व स्टॉलला तरुण शेतकरी मंडळींनी भेट दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्वेता ताई शेलगावकर आभार प्रदर्शन सुधीरजी दिवे यांनी केले.

# पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात एआयसीटीई अटल एफडीपीचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड मॅनेजमेंट, अमरावतीच्या इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग विभागामार्फत २ डिसेंबर ते ७ डिसेंबर २०२४ दरम्यान अभियांत्रिकी शिक्षणातील आयओटी आणि ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा उपयोग व एकत्रीकरण या विषयावर एआयसीटीई प्रायोजित अटल फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम (एफडीपी) आयोजित करण्यात आला आहे.

हा सहा दिवसांचा कार्यक्रम, इंटरनेट ऑफ थिंग्स (IoT) आणि ब्लॉकचेन सारख्या नवीन



तंत्रज्ञानाचा अभियांत्रिकी शिक्षणात महत्वपूर्ण उपयोग शोधण्यावर भर देणार आहे. या कार्यक्रमाचा उद्देश प्राध्यापकांना अद्ययावत ज्ञान व प्रत्यक्ष अनुभव देऊन या तंत्रज्ञानाचा त्यांच्या अध्यापन पद्धतींमध्ये प्रभावीरीत्या वापर करण्यासाठी सक्षम करणे आहे.या एफडीपीमध्ये आयआयटी, एनआयटी आणि विद्यापीठांतील प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ, उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ आणि तंत्रज्ञान विशारद विविध सत्रांद्वारे मार्गदर्शन करणार आहेत. आयओटी -सक्षम स्मार्ट सिस्टीम्स, ब्लॉकचेन आधारित अभियांत्रिकी समस्यांचे उपाय, आणि नवीन अध्यापन तंत्र यांसारख्या विषयांवर सखोल चर्चासत्रे व कार्यशाळा घेण्यात येतील. प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांद्वारे सहभागी प्राध्यापकांना मिळालेल्या ज्ञानाचा शैक्षणिक क्षेत्रात उपयोग कसा करावा हे शिकवले जाईल.आयओटी आणि ब्लॉकचेन यांसारखी तंत्रज्ञानं उद्योग आणि शिक्षणक्षेत्राचा चेहरामोहराच बदलत आहेत. ही एफडीपी प्राध्यापकांना भविष्यातील तंत्रज्ञानासाठी व इंडस्ट्री साठी विद्यार्थ्यांना तयार करण्यासाठी आवश्यक संसाधने उपलब्ध करून देणारी असले असे प्रतिपादन महाविद्यालयाचे संचालक व प्राचार्य यांनी केले.भारतभरातील विविध अभियांत्रिकी शाखांतील प्राध्यापकांना एकत्र आणून विचार व धोरणांची देवाणघेवाण करण्यासाठी हे कार्यक्रम सहाय्यभूत ठरणार आहे.७ डिसेंबर रोजी समारोप सत्रामध्ये सहभागी प्राध्यापकांना प्रमाणपत्रे वितरित करण्यात येतील आणि शैक्षणिक नवकल्पना प्रोत्साहनासाठी आयोजकांचे कौतुक करण्यात येईल.या एफडीपीचे समन्वयक डॉ. एस. बी. वरकड (डीन, गुणवत्ता आश्वासन विभाग) आणि डॉ. ए. एस. तेलंग (विभागप्रमुख, इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग विभाग) आहेत. तंत्रज्ञान एकत्रीकरणाच्या माध्यमातून अभियांत्रिकी शिक्षणात प्रगती घडवण्याच्या प्रयत्नांमध्ये पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड मॅनेजमेंटचे हे योगदान महत्त्वाचे ठरते.

# अंबा एक्स्प्रेसमध्ये आता ३ स्लीपर कोच, एक जनरल डबा वाढणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

अमरावती-सीएसएमटी क्र. १२१११/१२११२ अंबा एक्स्प्रेसच्या डब्यांच्या संरचनेत ८ डिसेंबरपासून बदल होणार असून, एसी थ्री टायरचे ४ डबे कमी करून त्याऐवजी ३ स्लीपर कोच व एक सामान्य श्रेणीचा डबा वाढवला जाणार आहे.

अंबा एक्प्रेसला एकूण २० कोच राहतील. एसी कोच वाढवल्यामुळे स्लीपर कोच कमी झाले होते. त्यामुळे स्लिपरचे आरक्षण मिळत नव्हते. अनेकांना मुंबईपर्यंतच्या प्रवासात अडचणींचा सामना करावा लागत होता. त्याचप्रमाणे तिकिटाचे पैसेहीजास्त द्यावे लागायचे. ते बघता एसी कोच कमी करून स्लीपर कोच व एक सामान्य श्रेणी डबा वाढवण्याची मागणी प्रवाशांकडून होत होती. त्यानुसार आता पुन्हा एकदा अंबा एक्स्प्रेसच्या संरचनेत बदल केला आहे. काही महिन्यांआधी २० डब्यांच्या या गाडीत केवळ दोन स्लीपर व एकच सामान्य श्रेणी




डबा होता. त्यामुळे सामान्य श्रेणीच्या डब्यात प्रवाशांची फारच गर्दी व्हायची. जागेसाठी भांडण ही तर नित्याचीच बाब झाली होती. ते बघता एक सामान्य श्रेणी डबा आता वाढवण्यात आल्यामुळे एकूण दोन सामान्य श्रेणी डबे झाले असून, तीन स्लीपर कोच वाढवल्याने एकूण ५ स्लीपर कोच झाले आहेत.

८ डिसेंबर रोजी सकाळी मुंबईहून येणारी अंबा एक्स्प्रेस अमरावती मॉडेल रेल्वे स्टेशनवर आल्यानंतर शंटिंगद्वारे कोचमध्ये बदल केला जाईल. त्यानंतर ८ डिसेंबरला रात्री ७ वाजून ७ मिनिटांनी अंबा एक्सप्रेस मुंबईकडे निघेल तिचेही स्वरूप बदलेले असेल, अशी माहिती मध्य रेल्वेद्वारे देण्यात आली. मुंबईहून ९ डिसेंबरला सकाळी अमरावतीत येणाऱ्या अंबा एक्सप्रेसच्या संरचनेत बदल झाला असेल. त्यानंतर अप व डाऊन अंबा एक्सप्रेसची संरचना ही सारखीच राहील.

# नवनिर्वाचित आ.सौ. सुलभाताई खोडके यांची श्रीकृष्ण मंदिर देवस्थान माताखिडकी येथे सदिच्छा भेट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

अमरावती शहरातील सर्वात पुरातन व रुख्मिणी स्वयंवर कथेचे प्रासंगिक दर्शन घडविणारे श्रीकृष्ण मंदिर देवस्थान माताखिडकी हे आपले श्रद्धास्थान असून कुठल्याही कार्याची सुरुवात करीत असतांना आपण श्रींच्या चरणी नतमस्तक होते. येथील प्रत्येक धार्मीक -सामाजिक कार्यात आपला नेहमीच सहभाग राहिला असून देवस्थानांसोबत एक ऋणानुबंध निर्माण झाला आहे. हाच ऋणानुबंध अविरत जोपासून आपण श्रींच्या कृपाशीर्वादाने आता अमरावतीच्या विकासाला नवी दिशा व गती देण्याचा प्रयत्न करणार असून धार्मिक स्थळांच्या ठिकाणी पायाभूत सुविधांची निर्मिती करण्यासाठी आपले सर्वोतोपरी प्राधान्य असल्याचे भावोद्गार अमरावती विधानसभा मतदार संघाच्या निवडणुकीत दुसऱ्यांदा विजयी झालेल्या आ.सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी व्यक्त केला.अमरावती विधानसभा मतदार संघाच्या निवडणूकीत महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या विजयी उमेदवार आमदार



सौ. सुलभाताई खोडके यांनी सर्वप्रथम श्रीकृष्ण मंदिर देवस्थान माताखिडकी येथे सदिच्छा भेट देऊन श्रींचे दर्शन व कृपाशिर्वाद घेतले. यावेळी देवस्थान संस्थांन विश्वस्त मंडळाच्या वतीने आमदार महोदयांचे स्वागत ,सत्कार व अभिनंदन करण्यात आले. यावेळी संस्थानचे अध्यक्ष सुभाष पावडे, उपाध्यक्ष डॉ. अशोकराव राऊत, ॲड. अरुण ठाकरे, कोषाध्यक्ष एस. पी. देशमुख, विश्वस्त मंडळातील नितीन भेटाळू, महिला प्रतिनिधी संजीवनी भेटाळू , अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक अजय पाटील मेहकरे आदीसह भक्त परिवार उपस्थित होता.यावेळी श्रीकृष्ण मंदिर देवस्थान माताखिडकीच्या वतीने आ.सौ. सुलभाताई खोडके यांचा सत्कार करतांना त्यांच्या अमरावती मधील पाच वर्षाच्या कारकिर्दीची प्रशंसा करत त्यांचे सर्वसमावेशक नेतृत्व ,व्यक्तिमत्व आणि कार्य हे शहराच्या धार्मिक, सामाजिक, अध्यात्मिक जडण-घडणीसाठी मोलाचे ठरत असल्याचे सांगितले. देवस्थानांसोबतही त्यांनी नेहमीच ऋणानुबंध जोपासत आपल्या विधायक कार्याने देवस्थानाच्या सत्कार्याला हातभार लावला आहे . त्यामुळे पुढेही त्यांच्या हातून जनकल्याणाचे कार्य सदैव घडत राहो अशा शब्दात विश्वस्त मंडळाच्या वतीने शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या.जनतेचा विश्वास, आशीर्वाद हीच आपली काम करण्याची ऊर्जा असून धार्मिक व आध्यात्मिक विचाराचा वसा आपण अविरत जोपासला आहे. श्रीकृष्ण मंदिर देवस्थान माताखिडकी हे आपले प्रेरणास्थान असून येथे आल्यावर मनाला प्रसन्नता व आनंद लाभत आहे. आगामी काळातही आपण देवस्थान च्या सर्व विश्वस्त मंडळाच्या सोबत असून तीर्थस्थळाप्रमाणे श्रीकृष्ण मंदिर देवस्थान माताखिडकीचा विकास आराखडा तयार करून अमरावतीचे धार्मिक वैभवाचे जतन करून येथील महत्व जगासमोर आणण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचा विश्वास आ.सौ.सुलभाताई संजय खोडके यांनी व्यक्त केला.

# थंडीबरोबर शेकोटीभोवती राजकीय विषयांचा धूर

## निवडणूक निकालासंबंधी गरमागरम गप्पा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० अचलपूर**

थंडी वाढल्याने गावोगावी संध्याकाळी शेकोट्या पेटू लागल्या आहेत. चौक, मंदिर, ग्रामपंचायत कार्यालयासमोर रात्री उशिरापर्यंत शेकोट्यांचे धूर निघत आहेत. शेकोटीभोवतीच्या या गप्पात विधानसभेच्या निकालावर जोरदार चर्चा होत आहे. मैत्रीच्या नात्यात बाधा येणार नाही याचीही खबरदारी घेतली जात आहे. खासकरून वसईत झालेल्या परिवर्तनाच्या चर्चा हा मुख्य विषय ठरत आहे. काही या निकालावर शंका व्यक्त करून आपले मत मांडत आहेत.

नोव्हेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात थंडीने चांगलाच जोर धरला आहे.अमरावती जिल्ह्यात तापमान १२ अंशाच्या खाली घसरले असल्याने रात्री आठनंतर ग्रामीण भागात थंडीचा जोर चांगला जाणवत आहे. थंडीपासून बचाव करण्यासाठी गावोगावी शेकोट्या पेटवल्या जात आहेत. थंडीपासून स्वतःचा बचाव करण्यासाठी अनेक जण या शेकोट्याभोवती राजकीय गप्पा मारत बसलेले पाहायला मिळत आहेत. थंडीपासून बचाव आणि राजकीय मनोरंजन असा दुहेरी हेतू यामुळे साधला जात आहे. या गप्पांमध्ये राजकीय गप्पांना रंगतदार फोडणी मिळत आहे. विधानसभेच्या निकालावर या गप्पा येऊन त्याला धार चढ़त आहे.



### कोणी सांगते कष्ट तर कोणी सांगतेय चुका

विजयी पक्षाचे कार्यकर्ते आम्ही कशी मोर्चेबांधणी केली, कोणी कोणी आम्हाला सहकार्य केले, विजयापर्यंत जाण्यासाठी कसे कष्ट घेतले. याची माहिती मीठ-मसाला लावून सांगत आहेत. पराभूत उमेदवाराचे कार्यकर्ते आमच्या चुका कोठे झाल्या, आम्ही कोठे कमी पडलो, याबाबतची सत्य परिस्थिती कथन करत आहेत. का करणे आवश्यक होते? हेही सांगत आहेत.

### शेती, व्यवसायाच्या कामांचीही होते आठवण

दोन्ही बाजूकडून विविध गोष्टी सांगितल्या जात आहेत. परंतु ग्रामीण जीवनाची वीण घट्ट असल्याने मैत्रीच्या नात्यांमध्ये राजकारण येऊ द्यायचे नाही याची खबरदारी दोन्ही बाजूकडून घेतली जात आहे. शेकोटीवर गप्पा कितीही गरम झाल्या तरी उद्याच्या शेती, नोकरी व व्यवसायातील कामांची आठवण होऊन एकमेकांची सहकार्याची भावना उफाळून येत आहे. शेकोटीचा शेवट गोड करताना ग्रामीण भागात हे चित्र पाहायला मिळत आहे.

# पीक विमा भारी; पण काढायला जमत नाही

## रब्बी पीक विमा : ऑनलाइनची कटकट वाढली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

शासनाने केवळ एक रुपया खर्चुन पीक विमा योजना आणली. पण आता या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना भलत्याच समस्येला सामोरे जावे लागत आहे. ग्रामीण भागात मोबाइलला आवश्यक तेवढे डाटा नेटवर्क नसते. त्यामुळे पीक पेरा करण्यात शेतकऱ्यांना अडचण येत असते. शहरी किंवा निमशहरी भागात कॉम्प्युटर सेंटरवर जाऊन पीक विमा काढावा लागतो. त्यावेळी पीक पेरा केला नसल्यास पीक विमा निघत नाही. ऑनलाइन अर्ज भरण्यात अडचणी यामुळे शेतकऱ्यांनी या योजनेला अपेक्षित असा प्रतिसाद मिळत नसल्याचे समोर आले आहे. दरम्यान, ३० नोव्हेंबर ही ज्वारी पिकाच्या विमा नोंदणीची तारीख असली तरी त्यालाही अल्प असा प्रतिसाद मिळाला आहे.

नैसर्गिक आपत्तीमध्ये पिके उद्ध्वस्त झाल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते. अवकाळी पाऊस, गारपीट, धुक्यामुळे पिकांचे नुकसान होते. यासाठी पीक विमा उपयुक्त ठरत आहे. शासनाने अवघ्या एक रुपयात पीक विमा योजना आणली आहे. शेतात पीक पेरणीपूर्वी मशागतीला मोठा खर्च व मेहनत घेतली जाते. शेताची मशागत केल्यानंतर पेरणीपासून काढणीपर्यंत झालेले नुकसान नैसर्गिक आग, वीज कोसळणे, गारपीट, वादळ, चक्रीवादळ पूर यांसारख्या नैसर्गिक आपत्तीत पिकाचे नुकसान झाल्यास भरपाई मिळते. यासाठी शासनाने रब्बी हंगामातील पिकांसाठी १ रुपयात पीक विमा ही योजना आणली. त्यासाठी पीक पेरा महत्वाचा असतो,पण ग्रामीण भागात मोबदला आवश्यक तेवढे डाटानेटवर्क नसते. त्यामुळे पीक पेरा करण्यात शेतकऱ्यांना अडचण येत असते. शहरी किंवा निमशहरी भागात कॉम्प्युटर सेंटरवर जाऊन पीक विमा काढावा लागतो. त्यावेळी पीक पेरा केला नसल्यास पीक विमा निघत नाही. सातबारा डाऊनलोड करून प्रिंट काढणे, ऑनलाइन अर्ज भरणे यासाठी वेगळी फी भरावी लागते. शिवाय हेलपाटे मारावे लागत असल्याने शेतकरी पीक विमा काढण्यास टाळाटाळ करतात. परिणामी नैसर्गिक आपत्तीत आल्यास ते नुकसानभरपाईपासून वंचित राहतात. यामुळे आता हजारो रुपयांचा खर्च करायचे; पण केवळ एक रुपया खर्चुन पीक विमा उतरण्याची शेतकऱ्यांची मानसिकता उरली नाही.रब्बीचे क्षेत्र आणि सहभागी शेतकऱ्यांची संख्या खूपच कमी आहे. गहू, हरभरा, ज्वारी, उन्हाळी भुईमूग या पिकांचा विमा योजनेत सहभाग असून त्याची मुदत संपत आली आहे. रब्बी हंगामासाठी शासनाने प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.



### सहभागासाठी मुदत

३० नोव्हेंबर – ज्वारी
१५ डिसेंबर – हरभरा, गहू
३० मार्च – भुईमूग

# एसटीच्या 'शिवशाही' बस अपघाताचे प्रमाण सर्वाधिक, ही आहेत कारणे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० नागपूर**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात (एसटी) सर्वाधिक अपघातांचे प्रमाण हे शिवशाही बसेसचे आहे. या बसेस वाईट अवस्थेत असतानाही महामंडळाकडून वातानुकुलितच्या नावाने सर्वाधिक प्रवासी भाडे आकारले जाते. गोंदिया जिल्ह्यात शिवशाही बसला झालेल्या अपघातामुळे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील (एसटी) या बसच्या वाईट अवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. राज्यात एसटी महांडळाच्या ताफ्यात साध्या, निमआराम, स्लिपर कोच, शिवशाही, ईलेक्ट्रिकसह सर्वप्रकारच्या सुमारे १५ हजार ६०० च्या जवळपास बसेस आहेत. त्यात ८९२ शिवशाही बसेसचा समावेश आहे.



एसटी महामंडळाच्या बसेसच्या अपघातांचे प्रमाण ०.१७ टक्के आहे. म्हणजे, सहा लाख किलोमीटरमागे एक अपघाताची नोंद आहे. यात शिवशाही बसच्या अपघातांचे प्रमाण ०.२९ टक्के आहे. म्हणजे प्रत्येक ३ लाख ५० हजार किलोमीटरमागे १ अपघात नोंदवला जात आहे. त्यामुळे शिवशाही बसने प्रवास करणाऱ्यांचा जीव धोक्यात असल्याचा आरोप एसटीतील कामगार संघटनेकडून केला जात आहे. या विषयावर एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांची प्रतिक्रिया मिळवण्याचा प्रयत्न केला असता प्रतिसाद मिळाला नाही.

# एकाही उमेदवाराने नोंदविला नाही आक्षेप आक्षेप नोंदविण्याची मुदत संपली

## पराभूत उमेदवारांसाठी दीड महिना सुरक्षित राहणार 'इव्हीएम' मधील डेटा



**अरुण जोशी**
**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० अमरावती**

अमरावती जिल्ह्यातील आठ ही विधानसभा मतदारसंघांतील एखाद्या पराभूत उमेदवाराने जर ईव्हीएम व मतदानाबद्दल काही आक्षेप नोंदविला तर ईव्हीएममधील डेटा पुढील दीड महिने (४५ दिवस) पोलिस बंदोबस्तात सुरक्षित राहणार आहे. त्यानंतर पराभूत उमेदवाराने आक्षेप घेतल्यास सबळ पुरावा असलेला ईव्हीएम डेटा उपलब्ध होणार नाही. शुक्रवारी (दि. २९) शेवटच्या दिवशी जिल्ह्यातून एका ही उमेदवाराने चिपसंदर्भात आक्षेप घेतला नसल्याची माहिती आहे.अमरावती,बडनेरा, अचलपूर,मोर्शी, धामणगाव, बडनेरा, तिवसाआणि दर्यापूर विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीचे निकाल २३ नोव्हेंबर रोजी जाहीर झाले.या निकालानंतर काही उमेदवारांकडून ईव्हीएमबाबत आक्षेप घेतले जाऊ शकतात. त्यामुळे निवडणूक आयोगाने आक्षेप नोंदविण्यासाठी एक प्रक्रिया ठरवून दिली आहे. त्या प्रक्रियेनुसारउमेदवारांना आक्षेप दाखल करता येते.निवडणूक आयोगाच्या निकषानुसार पराभूत झालेल्या दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकावरील उमेदवारास एकूण मतदान केंद्रांपैकी पाच टक्के केंद्रांच्या ईव्हीएम मशीनच्या पडताळणीची मागणी करता येते. केंद्रांवरील मतदान यंत्रांवर केवळ मतदानाचे प्रात्यक्षिक घेऊन पडलेली मते आणि व्हीव्हीपॅटच्या चिठ्ठ्या पडताळून पाहता येणार आहेत. प्रत्येक यंत्रासाठी ४० हजार रुपये आणि त्यावर १८ टक्के जीएसटी असे एकूण४७ हजार २०० रुपये इतके शुल्क आकारण्यात आल्याची माहिती आहे. उमेदवारांना आक्षेप नोंदविण्यासाठी २९ नोव्हेंबर २०२४ ही डेडलाइन देण्यात आली होती. शेवटच्या दिवशी अमरावती जिल्ह्यातील कोणत्याच उमेदवाराने आक्षेप घेतला नसल्याची माहिती आहे.

### अशी असेल पडताळणी प्रक्रिया

उमेदवाराने अनामत शुल्काचा भरणा केल्यानंतर त्यांचा अर्ज राज्य निवडणूक आयोगाकडे पाठविला जाईल. आयोगाकडून २२ डिसेंबरपूर्वी याबाबत पडताळणीची तारीख निश्चित करून दिली जाईल. त्यानुसार निश्चित तारखेला संबंधित उमेदवारांना बोलावून ही पडताळणी करून दाखविली जाईल.

# पसंतीच्या क्रमांकासाठी नको चक्कर; ॲपवर व्हीआयपी नंबर

## आधी जावे लागत होते कार्यालयात: घरबसल्या निवडा आपल्या पसंतीचा क्रमांक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० अमरावती**

तुम्हाला तुमच्या वाहनासाठी पसंतीचा क्रमांक हवा असेल, तर आरटीओ कार्यालयात जाण्याची, अर्ज करण्याची कटकट आता संपली आहे. परिवहन विभागाने पसंतीच्या क्रमांकासाठी सॉफ्टवेअर विकसित केले असून, ही सेवा राज्यभरातील आरटीओ कार्यालयांशी संलग्न करण्यात आली आहे.

अमरावती आरटीओ कार्यालयात २८ नोव्हेंबरपासून ही सुविधा सुरू झाली आहे. नागरिकांना आता घरबसल्या ऑनलाइन अर्ज व शुल्क भरून पसंतीचा क्रमांक मिळविता येणार आहे. आपल्या वाहनासाठी पसंतीचा क्रमांक मिळावा, यासाठी अनेकजण वाटेल ती किंमत मोजतात. अशावेळी पसंतीचा क्रमांक मिळवून देण्याच्या बहाण्याने दलालांची साखळी वाहन मालकांची लूटही करते, परंतु परिवहन विभागाने स्वतंत्र सॉफ्टवेअर विकसित केले आहे.



### व्हीआयपी नंबरसाठी मोजले १५ लाख

वाहनावर आपल्या आवडीनुसार नंबर घेतला जातो. लाखो रुपयांची कारची खरेदी केल्यानंतर आवडीच्या नंबरसाठी मोठी रक्कम मोजतात. यंदा आतापर्यंत व्हीआयपी नंबरसाठी १५ लाखांवर रक्कम मोजली गेली आहे.

### सॉफ्टवेअर बनणार; नंबर ऑनलाइन मिळणार

लकी नंबर मिळविण्यासाठी वाहनधारक अधिक पैसे मोजायला तयार असतात. सध्या आरटीओ कार्यालयात जाण्याऐवजी ऑनलाइन नंबर मिळवता येणार आहे. आता दलालापासून सुटका मिळणार आहे. आकर्षक क्रमांकासाठी वाहन चालकांना पैसे मोजावे लागणार नाही.

### दलालांचा पत्ता कट

पसंतीचा नंबर मिळवून देण्याच्या अनुषंगाने अनेक दलाल सक्रिय असतात; मात्र आता ऑनलाइन पद्धतीने काम होणार असल्याने दलालांचा पत्ता कट झाला आहे.

# खासगी बाजाराच्या तुलनेत कापूस उत्पादकांची 'सीसीआय'ला पसंती

## कापूस बाजारात दाखल : सीसीआयकडून ७,४७१ रुपये दर जिल्ह्यात आठ खरेदी केंद्र सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

खरीपाचा कापूस बाजारात दाखल झाला आहे. सीसीआय व खासगी बाजारात कापसाच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार सुरू झाले आहे. खासगी बाजारात सरासरी ७ हजार २८७ तर सीसीआयकडून ७ हजार ४७१ रुपये दर मिळत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा सीसीआयकडे वाढता कल दिसून येत आहे. जिल्ह्यात शुक्रवारी सीसीआयकडे २४४ क्विंटलची आवक नोंदविण्यात आली.

जिल्ह्यात सोयाबीननंतर कापसाचे मोठ्या प्रमाणात उत्पन्न घेतले जाते. यंदा देखील दुसऱ्या क्रमाकांचे पीक म्हणून कापसाला पसंती देण्यात आली आहे. जिल्ह्यात साधारणतः लांब धाग्याच्या कापसाचे उत्पादन होते. यंदाच्या हंगामातील कापसाचे आगमन बाजारात झाले असून एकाधिकार मोडीत निघाल्यानंतर आता सीसीआयमार्फत खरेदी करण्यात येत आहे. जिल्ह्यात आठ केंद्र सुरू करण्यात आले असून येथील नांदगाव पेठ केंद्रावर २४४ क्विंटल कापसाची आवक नोंदविण्यात आली आहे. केंद्राने लांब धाग्याच्या कापसासाठी ७,५२१ रुपये प्रतिक्विंटल तर मध्यम धाग्याच्या कापसासाठी ७ हजार १२१ रुपये हमीदर जाहीर केला आहे. एफएक्यू दर्जाचा कापूस सीसीआय खरेदी करते. अटींच्या अधीन शेतकऱ्यांच्या कापसाला सद्या सीसीआयकडून सरासरी ७ हजार ४७१ रुपये दर मिळू लागला आहे. हमीदराच्या तुलनेत तो ५० रुपये कमी आहे. खासगी बाजारात कापसाला खरेदीदारांकडून किमान ७,२६५ व कमाल ७,३०० रुपये दर मिळत आहे. येथील बाजार समितीमधे शुक्रवारी ६० क्विंटल कापसाची आवक झाली असून सरासरी ७, २७८ रुपये दर मिळाला. हा दर हमीदराच्या तुलनेत २४३ रुपये कमी आहे.

# ८ मतदारसंघात १७ हजार ६९७ पोस्टल मतदान ५ मतदारसंघात पोस्टल बॅलेटची सर्वाधिक मते

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० अमरावती**

निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणुकीसाठी कर्तव्यावरील शासकीय कर्मचाऱ्यांना पोस्टल बॅलेटची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. अमरावती जिल्ह्यात १७ हजार ६९७ कर्मचाऱ्यांनी मतदान केले. यामध्ये आठपैकी चार मतदारसंघात पराभूत उमेदवारांनाच विजयी उमेदवारांपेक्षा अधिक मतदान झाल्याचे दिसून येत आहे. यात महाविकास आघाडीचा एक विजयी, तीन पराभूत तसेच एक प्रहार अशा पाच उमेदवारांना सर्वाधिक पोस्टल मतदान झाल्याचे समारे आले आहे.

जिल्ह्यात आठ विधानसभा मतदारसंघात २० नोव्हेंबरला मतदान आणि २३ नोव्हेंबरला मतमोजणी पार पडली. राज्यासह जिल्ह्यात देखील मतदारांनी महायुतीलाच कौल दिला आहे. महायुतीचे आठपैकी सात मतदारसंघात आमदार विजयी - झाले आहेत. केवळ दर्यापूर - मतदारसंघांत महाविकास आघाडीचे उमेदवार गजानन लवटे निवडून आले. जिल्ह्यात महायुतीची सरशी दिसून आली असली तरी पोस्टल मतदानात मात्रमहायुतीला नाकारल्याचे दिसून येत आहे. बडनेरा, मोर्शी आणि मेळघाट या तीन मतदारसंघातच महायुतीच्या उमेदवारांनी पोस्टलमध्ये आघाडी घेतली तर इतर पाच मतदारसंघात महायुतीच्या आमदारांना महाविकास आघाडीच्या पराभूत उमेदवारांपेक्षा पोस्टलची कमी मते मिळाली आहे.

जिल्ह्यात १७ हजार ६९७ पोस्टल बॅलेटद्वारे मतदान झाले. यामध्ये १ हजार ८८३ मते ही अवैध ठली असून १५ हजार ८१४ मते वैध आहे. यामधून चक्क १३८ मतदारांनी नोटाला पसंती दिली आहे. तर इतर झालेल्या मतदानावरून अचलपूरमध्ये पराजित उमेदवार बच्चू कडू यांना सर्वाधिक पोस्टल मते मिळाली आहे. सोबतच तिवसा झोने राजेश वानखडे यांच्यापेक्षा मविआच्या उमेदवार ॲड. यशोमती ठाकूर यांना अधिक मते मिळाली आहेत. अमरावतीत पोस्टल मतदानात सुनील देशमुख व धामणगाव रेल्वे येथे वीरेंद्र जगताप अव्वल आहेत. तसेच दर्यापूर मतदारसंघातील महाविकास आघाडीचे विजयी उमेदवार गजानन लवटे यांना सर्वाधिक पोस्टल मते मिळाली आहेत.

# लग्नसराईचा थाटबाट; आता लग्नापेक्षा 'प्री-वेडिंग'ला अनेकांची पसंती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० अमरावती**

लग्न हा प्रत्येकाच्या आयुष्यातील एकअविस्मरणीय प्रसंग आणि हाच प्रसंग आयुष्यभर जपून ठेवावा, यासाठी फोटोग्राफी, व्हिडीओ शूटिंग केले जाते. आता त्यामध्ये नवनवीन प्रकार समोर येत असून, लग्न प्रसंगासोबतच प्री-वेडिंगची क्रेझ झपाट्याने वाढली आहे. अनेकांची प्री-वेडिंगला पसंती मिळत आहे.



एकेकाळी लग्न साध्या पद्धतीने होत होते; परंतु आता लग्नाचा थाटबाटच बदलला आहे. कोरोनाकाळात अत्यंत साध्या पद्धतीने पार पडलेले विवाह सोहळे पाहता फोटोग्राफी बंद होण्याच्या वाटेवर असताना आता फोटोग्राफीचे रंगरूपच बदलले आहे.आता लग्नात ड्रोन कॅमेरे, लग्ना आधी लागणारी हळद आणि प्री-वेडिंग असे अनेक प्रकार समोर आले असून, त्यास अनेकांची पसंती मिळत आहे. तुळशी विवाह आटोपल्यानंतर आता लग्नसराईचे सनई चौघडेवाजत आहेत. यामध्ये प्री-वेडिंगच्या नवीन प्रकारास पसंती दिली जात असून, यामध्ये लग्नापूर्वी नववधू-वराचे निसर्गरम्य ठिकाणी जाऊन फोटोग्राफर व व्हिडीओग्राफर फिल्मी स्टाईलने चित्रीकरण करीत आहे.शहरी तसेच ग्रामीण भागातही याची क्रेझ प्रचंड वाढली आहे.

### आकर्षक 'अल्बम'

पूर्वी लग्नात साध्या पद्धतीने फोटो काढले जात होते. मात्र, आता लग्नातील अनमोल क्षण जपून ठेवण्यासाठी आकर्षक फोटो अल्बमचा वापर वाढला आहे. या अल्बममधील अनेक प्रकार लोकप्रिय असून, अनेकांची त्यास पसंती आहे.

### लग्नाचा खर्च वाढला!

पूर्वीच्या काळी लग्नावर किमान खर्च होत होताः परंतु आता लग्नातील खर्च प्रचंड वाढला आहे. यासाठी डीजे, भव्य मंगल कार्यालय, लायटिंग, गाड्या-घोड्या आणि इतर खर्चाची भर पडली आहे.

मागील काही दिवसांपासून प्री-वेडिंग फोटोग्राफी, आकर्षक अल्बम काढण्याकडे अनेकांचा कल वाढला आहे. यासाठी महागडे कॅमेरे वापरले जाते. केवळ शहरातच नव्हे, तर ग्रामीण भागातही प्री-वेडिंगची मागणी होत आहे.

### फोटोग्राफीचे बदललेले स्वरूप !

आधी लग्नात साध्या पद्धतीने फोटो, व्हिडीओ शूटिंग घेतली जात होतीः परंतु आता कलात्मक फोटोग्राफी आणि फिल्मी अंदाजमधील शूटिंग काढण्यावर भर दिला जात आहे. ड्रोन कॅमेरे यासह आकर्षक पद्धतीचा वापर होत असल्याचे दिसून येत आहे.